# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२५

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**गुरुवार, दिनांक ०३ जुलै, २०२५ / आषाढ १२, १९४७ (शके)**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **उप मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** | |
| **(३)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | |
| **(४)** | **ग्रामविकास व पंचायत राज मंत्री** | |
| **(५)** | **अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४६**

---

**बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये सहाय्यक प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(१) * २५५४ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये सहाय्यक प्राध्यापकांची रिक्त असलेली ५५८ पदे गत अनेक वर्षांपासून भरण्यात आली नसल्याची बाब माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालय ही मुंबईतील रहिवाशांच्या आरोग्याच्या दृष्टीने खूप महत्वाची असून गत ६ ते ७ वर्षांपासून सहाय्यक प्राध्यापकांची पदभरती झाली नसल्यामुळे सहाय्यक प्राध्यापकांमध्ये प्रचंड नाराजी असून, पात्रतेसाठी त्यांची वयोमर्यादा निघून जात असून उक्त पदे न भरल्याने महाविद्यालयातील विद्यार्थी व रुग्ण यांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने निर्णय घेवून बृहन्मुंबई महानगरपालिकेंतर्गतच्या वैद्यकीय महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

रुग्णांची गैरसोय होऊ नये याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या चारही प्रमुख महाविद्यालयामार्फत रिक्त पदे कंत्राटी तत्वावर भरण्यात येत आहेत.
(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या चारही प्रमुख रुग्णालय तसेच नायर रुग्णालय दंत महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापकांची रिक्त पदे नियमित तत्वावर भरण्याची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील कबुतरखाने बंद करण्याबाबत

**(२) * २४२३ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील कबुतरांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने नागरिकांना श्वसनाच्या आजाराचा धोकाही निर्माण होत असल्याने दादर व सीएसटी येथील कबुतरखाना बंद करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कबुतरांच्या विष्ठेमुळे आणि त्यांच्या पिसांमुळे विविध प्रकारचे श्वसनविकार,अनेक प्रकारची संक्रमणे तसेच बुरशीजन्य रोग होण्याची शक्यता असून बृहन्मुंबई महानगरपालिकेने (BMC) सार्वजनिक ठिकाणी कबुतरांसाठी अन्न टाकणाऱ्या नागरिकांवर दंडात्मक कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे काय,
(३) असल्यास, नागरिकांच्या आरोग्यांचा विचार करता दादरचा सुप्रसिध्द कबुतरखाना आणि अन्य ठिकाणचे अनधिकृत कबुतरखाने तातडीने हटविण्याच्या मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) दादर येथील कबुतरखाना वाहतूक बेटावर स्थित असून पुरातन वास्तु जतन श्रेणी-२ अ मध्ये समाविष्ट आहे. एच/पश्चिम विभागातील खार स्टेशन (पश्चिम) व दौलत नगर, सांताक्रुझ (प) येथील अनधिकृत कबुतर खाने बंद करण्यात आले असून, खार स्टेशन (प) येथे वाहतूक बेट व दौलत नगर, सांताक्रुझ (प) येथे महानगरपालिकेद्वारे मियावाकी उद्यानाची निर्मिती करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मैला सफाई कामगारांना अपंगत्व आल्यास त्यांच्या वारसांना आर्थिक नुकसान भरपाई देण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत

**(३) * ३१६३ श्री.श्रीकांत भारतीय, श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सफाई कामगारांसंदर्भात गतवर्षी शासनाने मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या असून मुंबईत मलनि:स्सारण वाहिन्या आणि गटारांची सफाई करताना अनेक सफाई कामगारांनी आपला जीव गमवूनही बृहन्मुंबई महानगरपालिकेने आजमितीस या संदर्भात कोणतेही धोरण जाहीर केले नसल्याची बाब दिनांक १ मे, २०२५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्वोच्च न्यायालयाने हाताने मैला साफ करण्यास बंदी घातलेली असतानाही राज्यातील विविध ठिकाणी मेनहोल, मलजल वाहिन्या व मैला टाकी सफाईचे काम सफाई कर्मचाऱ्यांकडून हातानेच करवून घेतले जात असल्याची बाब माहे एप्रिल,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे कायमस्वरूपी व कंत्राटी असे मिळून एकूण ३५ हजार कर्मचारी कार्यरत असताना दरवर्षी या सफाई कर्मचाऱ्यांपैकी सुमारे ५०० कर्मचाऱ्यांचा मृत्यू होत असून सन २०१३ ते २०२२ या कालावधीत राज्यात ३२ सफाई कर्मचाऱ्यांचा अपघाती मृत्यू झाला असून त्यापैकी ९८ टक्के कर्मचाऱ्यांचा मृत्यू मैला व सांडपाणी सफाईच्या कामादरम्यान झाल्याचे, तर नागपाडा (जि.मुंबई शहर) येथील एका इमारतीच्या तळघरातील पाण्याच्या टाकीत गुदमरून चार सफाई कामगारांचा मृत्यू झाल्याची बाब माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर कामे बहुतेक वेळा अनसूचित जातींमधील, सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या व्यक्तींनाच दिली जात असून या प्रथेमुळे सामाजिक भेदाभेद व जातीआधारित शोषण कायम राहत असून घटनात्मक अधिकारांचा भंग होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, मृत सफाई कर्मचाऱ्यांचा कोणत्याच नोंदी ठेवण्यात येत नसल्याने त्यांच्या नातेवाईकांना भरपाईची १० लाख रूपयांची रक्कमही मिळत नसल्याची बाब सफाई कामगार परिवर्तन संघाचे अध्यक्ष यांनी मांडल्याची बाब माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, झोपडपट्टी भागात साफसफाई करण्याकरीता मशीनचा वापर होत नसल्याने सफाई कामगारांना प्रत्यक्ष जाऊनच सफाईची कामे करावी लागत असून, राज्यातील सर्वच सफाई कर्मचाऱ्यांना आवश्यक सुरक्षात्मक साधने पुरविण्याबाबत, सफाई कर्मचाऱ्यांच्या संख्येत वाढ करण्याबाबत तसेच त्यांची योग्य ती नोंद ठेवून मृत सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना सहजतेने नुकसान भरपाईची रक्कम मिळण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

दूषित गटारामध्ये काम करताना मृत्यू पावलेल्या / कायम अपंगत्व / अपंगत्व आलेल्या मॅन्युअल स्कॅव्हेंजर्सना / सफाई कामगारांना नुकसान भरपाई अदा करणेबाबत राज्याच्या धोरणाबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दिनांक ३०/०४/२०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मलनिःसारण प्रचालन खात्यातील व कंत्राटदाराकडे कार्यरत असलेल्या एकाही कामगाराचा मलनिःसारण वाहिन्यांची साफसफाई करताना सन २०१३ पासून आजपर्यंत मृत्यू झालेला नाही, असे आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी कळविले आहे.
(२) हे खरे नाही.

शासनाच्या दिनांक ०५ मार्च, २०१८ च्या शासन निर्णयान्वये व दिनांक ०३ मे, २०२४ च्या परिपत्रकान्वये सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी सेप्टीक टँक, भूमिगत गटारे इत्यादींची साफसफाई केवळ यांत्रिक पध्दतीने अथवा मशीन द्वारे करण्याबाबत सूचना निर्गमित केलेल्या असून केवळ अपरिहार्य परिस्थितीतच कामगारांमार्फत साफसफाई करण्यात यावी, अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मलनिःसारण प्रचालन खात्यात आजमितीस कायमस्वरुपी १,८०८ व कंत्राटदाराकडे ४९० एवढे कर्मचारी कार्यरत आहेत.

तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या व कंत्राटदाराकडे कार्यरत असलेल्या एकाही कामगाराचा मलनिःसारण वाहिन्यांची साफसफाई करताना सन २०१३ पासून आजपर्यंत मृत्यू झालेला नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

तथापि, मार्च २०२५ मधील संदर्भाधीन दुर्घटनेबाबतच्या प्रथम खबरी अहवाल (F.I.R.) मध्ये सुतार काम करणारे मजुर मृत्यूमुखी पडल्याचे नमूद केले आहे. सदर मजुर हे सफाई कामगार नव्हते असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

सन २०१३ ते २०२२ या कालावधीत राज्यातील विविध महानगरपालिकांमध्ये ३५ कामगारांचा मलनि:सारण वाहिन्या, सेप्टीक टँक सफाई करताना मृत्यू झाल्याचे आढळून आले आहे.

(४) हे खरे नाही.

मलनिःसारण वाहिन्यांची साफसफाई वाहन सयंत्रांव्दारे संपूर्णपणे यांत्रिकी पध्दतीने व सर्व सुरक्षा साधनांचा वापर करुन करण्यात येते. सदर कामाकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेचे कायमस्वरुपी तसेच मलनिःसारण वाहिन्यांची साफसफाई करण्याचे कंत्राट दिलेल्या कंत्राटदारांकडील कामगार हे सर्व जाती धर्माचे असून त्यामुळे कुठल्याही प्रकारचा भेदाभेद अथवा जातीआधारित शोषण होत नाही.

(५) व (६) हे खरे नाही.

मलनि:सारण कुंड/ खड्डे, भूमिगत गटारे, मलनि:सारण वाहिन्यांमध्ये सफाई वेळी मृत पावलेल्या कामगारांच्या वारसाला रुपये ३० लाख एवढी नुकसान भरपाई देण्याबाबत त्याचप्रमाणे कायमच्या अपंगत्वासाठी रुपये २० लाख व अपंगत्वासाठी रुपये १० लाख एवढी नुकसान भरपाई अदा करणेबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दिनांक ३०/०४/२०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. मृत पावलेल्या सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना नुकसान भरपाई दिल्यानंतर त्याची नोंद ठेवली जाते.

-----------------

## राज्यातील विविध शहरात मॉलकरीता ना-हरकत प्रमाणपत्र देताना अनियमितता होत असल्याबाबत

**(४) * ३३५१ श्री.कृपाल तुमाने, श्री.हेमंत पाटील, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्वच शहरी भागात मॉल संस्कृती मोठ्या प्रमाणात अस्तित्वात येत असून सदर बांधकाम करित असताना विविध विभागाच्या अनेक परवानग्या तसेच ना-हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अश्या परवानग्या देत असताना तसेच वेळोवेळी सदर ठिकाणी तपासणी होत असताना मोठ्या प्रमाणात अनियमितता होत असल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त असून वांद्रे येथील लिंक स्वेअर मॉलला भीषण आग लागण्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, यापूर्वीही मुंबईत,भांडूप, मुंबई सेंट्रल, विलेपार्ले येथील मॉलमध्ये अशाच प्रकारे आग लागल्याच्या घटना घडल्या असल्याने अग्निप्रतिबंधात्मक यंत्रणेचा प्रश्न गंभीर झाला असून सदर मॉलमधील अग्निरोधक यंत्रणा कार्यरत नसल्यामुळे यापूर्वी ही आग लागल्याच्या घटना घडल्या असल्याने संबंधित विभाग याकडे दुर्लक्ष करीत आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुंबईत तसेच राज्यातील अनेक मॉलमध्ये आग लागण्यामागची कारणे शोधून त्यादृष्टीने अग्निरोधक यंत्रणा प्रभावी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली तसेच सदर प्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) वांद्रे मुंबई येथील लिंक स्क्वेअर मॉलला दिनांक २९/०४/२०२५ रोजी भीषण आग लागली, ही बाब खरी आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने सदर मॉलच्या इमारतीचे केलेल्या तपासणी दरम्यान इमारतीची स्थायी अग्निशमन यंत्रणा बंद असल्याची अनियमितता आढळून आली आहे.

भांडूप येथील ड्रीम्स मॉल, मुंबई सेंट्रल येथील आर्कीड सिटी सेंटर मॉल, विलेपार्ले येथील प्राईम मॉल व वांद्रे येथील लिंक स्क्वेअर मॉल मधील आगीच्या घटनेच्या वेळेस अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित नव्हती.

त्याअनुषंगाने सदर मॉलच्या संबंधित मालक / भोगवटादार यांच्यावर महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना कायदा २००६ अंतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे कारवाई करण्यात आलेली आहे. त्यानुसार मुंबई सेंट्रल येथील आर्कीड सिटी सेंटर मॉल व विलेपार्ले येथील प्राईम मॉलमधील अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित करण्यात आलेली होती. आगीच्या घटनेनंतर भांडूप येथील ड्रीम्स मॉल व वांद्रे येथील लिंक स्क्वेअर मॉल सद्य:स्थितीत बंद आहेत.

मुंबई अग्निशमन दलामार्फत यादृच्छिक (Randomly) पध्दतीने मॉल / इमारतीची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये अग्निसुरक्षितेच्या दृष्टिने त्रुटी आढळून आल्यास महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव जीवसंरक्षक कायदा २००६ नुसार कारवाई करण्यात आली आहे. त्यामुळे संबंधित विभाग याकडे दुर्लक्ष करत आहे, ही बाब खरी नाही.
(४) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव जीवसंरक्षक कायदा २००६ नुसार मॉल/इमारतीत बसविण्यात आलेली स्थायी अग्निशमन यंत्रणा सुस्थितीत ठेवण्याची व त्यासाठी महाराष्ट्र शासनाने नेमणूक केलेल्या लायसन्स प्राप्त अभिकरणाची नेमणूक करण्याची जबाबदारी मालक /भोगवटादार यांची आहे, तसेच सदर यंत्रणा कार्यान्वित ठेवून सहामाही अहवाल (फॉर्म बी प्रमाणपत्र) मालक /भोगवटादार यांनी प्रत्येक वर्षाच्या जानेवारी व जुलै या महिन्यामध्ये मुंबई अग्निशमन दलास सादर करणे बंधनकारक आहे.

मुंबई अग्निशमन दलामार्फत यादृच्छिक (Randomly) पध्दतीने मॉल / इमारतीची तपासणी करण्यात येते. त्यामध्ये अग्निसुरक्षितेच्या दृष्टिने त्रुटी आढळून आल्यास महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव

जीवसंरक्षक कायदा २००६ नुसार कारवाई करण्यात येते.

वांद्रे येथील लिंक स्क्वेअर मॉल मधील अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित नसल्याने मॉलच्या मालक / भोगवटादार यांच्यावर महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव जीवसंरक्षक कायदा २००६ नुसार नोटीस बजाविण्यात आलेली आहे. सद्य:स्थितीत लिंक स्क्वेअर मॉल बंद आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने पवना, मुळा व इंद्रायणी या नद्यांचे पुनरुज्जीवन प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(५) * २९८१ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.योगेश टिळेकर, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी चिंचवड मधील पवना, मुळा आणि इंद्रायणी या नद्यांचे प्रदूषण रोखण्यासाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने नदी पुनरुज्जीवन प्रकल्प हाती घेतला असून या प्रकल्पाचा सविस्तर कृती आराखडा तयार करून सल्लागार नियुक्ती बाबत तिसऱ्यांदा निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सीमेवर असणाऱ्या मुळा नदीचे नदी सुधारच्या नावाखाली मुळा नदीपात्र अरुंद केले जात असून त्यास पर्यावरणवादी संघटनांनी विरोध दर्शविला असून सदर नदीचे होणारे कॉंक्रिटीकरण थांबवून नद्या स्वच्छ करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या मागदर्शनाखाली नदी बचाव शिष्टमंडळाने मा.मुख्यमंत्री यांच्याकडे विनंती केली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नदी प्रदूषण रोखण्याची कार्यवाही करण्याबाबत शासनाचा आदेश असतानाही अधिकाऱ्यांकडून दिरंगाई होत असून सविस्तर प्रकल्प अहवाल ((Detailed Project Report) तयार केल्यास सर्व प्रक्रिया होऊन प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईपर्यंत नद्यांचे प्रदूषण आणखी वाढेल, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पिंपरी चिंचवडची मेट्रोसिटीकडे वाटचाल होत असताना नदी सुधारणाच्या पहिल्या टप्प्यात मुळा नदीच्या सुशोभीकरणासाठी भराव टाकण्यात येत असून, सदर सुशोभीकरणाच्या नावाखाली नदीकाठची जैवविविधता नष्ट करण्याचा प्रयत्न महानगरपालिकेने केला असून याविरोधात पर्यावरण आणि वन्यजीव प्रेमींनी नाराजी व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी नद्यांचे प्रदूषण रोखण्यासाठी, नदीपात्रातील कॉंक्रिटीकरण व पूरस्थिती निवारण करण्यासंदर्भात तसेच शासनाने मुळा नदीवरील निसर्गचक्र खंडित न करता व जलजीवसृष्टी नष्ट न करता ती कायम ठेवण्यासाठी कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत इंद्रायणी नदी सुधार प्रकल्प राबविण्यासाठी Wapcos limited या सल्लागार संस्थेमार्फत रुपये ६७१ कोटी खर्चाचा प्रकल्प अहवाल तयार करुन केंद्र शासनाच्या राष्ट्रीय नदी संवर्धन संचालनालयाकडे पर्यावरण विभागामार्फत दिनांक २५/०९/२०२४ रोजी सादर करण्यात आलेला आहे. पवना नदी सुधार प्रकल्पासाठी Penstruct या संस्थेमार्फत रुपये २१८ कोटी खर्चाचा प्रकल्प अहवाल तयार करुन राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाकडे दिनांक २४/०३/२०२५ रोजी प्राप्त झालेला असून त्याची छाननी पर्यावरण विभागाच्या स्तरावर सुरु आहे. तसेच मुळा-मुठा नदी सुधार प्रकल्प राबविण्यासाठी प्राधिकरण स्तरावर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी सल्लागार नियुक्तीचे कार्यवाही सुरु आहे. केंद्र शासनाच्या राष्ट्रीय नदी संवर्धन संचालनालयामार्फत नदी सुधार कार्यक्रमासाठी केंद्र शासनाचे ६० टक्के सहभाग व संबंधित यंत्रणेचे ४० टक्के सहभागावर नदी सुधारण्याचा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. पीएमआरडीएमार्फत तयार केलेल्या प्रकल्पा अहवालानुसार कार्यवाही करण्याच्या दृष्टीने प्राधिकरण स्तरावर इंद्रायणी नदी व पवना नदी वरील नदी सुधार कार्यक्रम राबविण्यासाठी नमूद केलेली कामे करण्याकरीता सल्लागार नियुक्ती करीता निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. सदर निविदेकरीता प्रथम दोन टप्प्यात प्रसिध्द केलेल्या निविदेस अल्प प्रतिसाद मिळाल्यामुळे नव्याने निविदा प्रसिध्द करण्यात आली. यामध्ये M/s. Tandon Urban Solutions Pvt. Ltd या संस्थेचे न्युनतम देकार असल्याने इंद्रायणी व पवना नदी पुनरुज्जीवनची कामे करण्याकरीता प्राधिकरणामार्फत या संस्थेची सल्लागार म्हणून नियुक्ती केली आहे.

(४) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत हाती घेण्यात येणाऱ्या मुळा नदी पुनरुज्जीवन प्रकल्पासाठीचा Hydrology and Hydraulic अहवाल CWPRS (Central Water and Power Research Station) संस्थेमार्फत प्रमाणित करण्यात आला असून त्यास राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाचा ना-हरकत दाखला प्राप्त झाला आहे. सदर ठिकाणी मंजूर Hydrology and Hydraulic अहवालानुसार काम करण्यात येत आहे.

(५) इंद्रायणी, पवना व मुळा-मुठा या नदी काठी पुणे मनपा, पिंपरी चिंचवड मनपा तसेच पीएमआरडीए यांच्यामार्फत या नदी प्रदूषण निर्मुलन नदी संवर्धन पुनरुज्जीवन कार्यक्रम हाती घेतला आहे. यांतर्गत नदी काठच्या ठिकाणी निसर्ग चक्र खंडीत व जलसृष्टी नष्ट न करता कार्यक्रम राबविण्याचे नियोजित आहे. यासाठी पर्यावरण वादी संघटना यांच्याशी चर्चा करुन त्यांच्या सुचनांचा समावेश कार्यक्रम राबविताना करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सर्वंकष घनकचरा व्यवस्थापनासाठी धोरण निश्चित करण्याबाबत

**(६) * २६९७ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.राजहंस सिंह, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.सुनिल शिंदे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने घनकचरा व्यवस्थापन कायदा करुन ९ वर्षे होऊनही या कायद्यानुसार राज्यासाठी सर्वंकष घनकचरा व्यवस्थापनासाठी धोरण व योजना आखली नसून राज्यात सन २०२१-२२ या कालावधीत ४१ टक्के असंकलित कचऱ्याची नोंद करण्यात आल्याचे भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक (कॅग) यांनी आक्षेप घेऊन आपल्या अहवालात नमूद केले असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कॅगच्या अहवालामुळे घनकचरा व्यवस्थापन व प्रक्रियेबाबतची उदासिनता निदर्शनास आली असून केंद्रशासनाने घनकचरा व्यवस्थापन नियम लागू केल्यापासून एका वर्षाच्या आत राज्यासाठी घनकचरा धोरण व घनकचरा व्यवस्थापन आखावे असे निदेश देवूनही शासनाने अद्यापही सदर प्रकरणी कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील शहरात नवीन रस्ते, नवीन इमारती, वसाहती उभ्या राहत असून शहरी आणि ग्रामीण भागात वाढत्या लोकसंख्येमुळे दररोज निर्माण होणाऱ्या घन कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन होत नसल्याने सर्वत्र कचऱ्याची समस्या निर्माण झाली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुंबई पूर्व उपनगरातील कांजुरमार्ग येथील महानगरपालिकेच्या कचराभूमीतील कचऱ्याची दुर्गंधी दिवसेंदिवस वाढत असून परिणामी कांजुरमार्ग, भांडूप, विक्रोळी येथील नागरिकांना याचा सामना करावा लागत असून आरोग्य विषयक समस्या उद्भवण्याच्या भीतीने येथील रहिवासी स्थलांतर करण्याचा प्रयत्न करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे पाचही डंपिंग ग्राऊंड विविध कारणांनी बंद पडणार असल्याने मुंबईतील कचरा विल्हेवाटीचा प्रश्न गत १० वर्षांपासून प्रलंबित असून घरगुती, औद्योगिक, जैविक आणि विशेषतः प्लास्टिक कचऱ्याचे प्रमाण झपाट्याने वाढत असल्याने हे प्लास्टिक मातीत मिसळत नसून ते तसेच नद्यांमध्ये व पाण्याचे स्रोतामध्ये पोहचून मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, देवनार (मुंबई) येथे ६०० मेट्रिक टन प्रतिदिन क्षमतेचा कचरा प्रक्रिया करणारा आणि चार मेगावॅट वीज निर्मिती करणारा प्रकल्प तातडीने कार्यान्वित करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) असल्यास, याप्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिका व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे वारंवार तक्रारी येऊनही कोणतीही दखल घेण्यात आली नसून कॅगच्या अहवालानुसार मुंबईतील सुमारे हजारो मेट्रिक टन कचऱ्याची विल्हेवाट करण्याच्या दृष्टीने बृहन्मुंबई महानगरपालिकेने पर्यायी व्यवस्था केली आहे काय, भविष्यात बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने अत्याधुनिक तंत्रज्ञान मशिन्सचा वापर करावा या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येते आहे, नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय.

तथापि, आता राज्याची कचरा संकलनाची टक्केवारी ८९.२४ % इतकी असल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

घनकचरा व्यवस्थापनाबाबत शासन परिपत्रक दिनांक २९ एप्रिल, २०१७ अन्वये सर्वंकष सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. तसेच राज्याचे घनकचरा व्यवस्थापन धोरण तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) हे खरे नाही.

MIS (SBM Portal) नुसार महाराष्ट्र राज्यातील ४१२ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कचरा संकलनाची टक्केवारी ९९ इतकी असून कचरा मुक्त शहर (Garbage Free City)-२०२३ सर्वेक्षणानुसार कचरा संकलनाची टक्केवारी ८९.२४ इतकी आहे.

(४) कांजूर येथील नागरी घन कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठीचा प्रकल्प राबविताना सभोवतालच्या नागरिकांना दुर्गंधीचा त्रास होऊ नये याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिका व प्रकल्पासाठी नियुक्त केलेले प्रचालक यांचेकडून सर्वतोपरी उपाययोजना करण्यात येतात.

(५) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत कार्यान्वित असलेल्या कांजूर घनकचरा प्रक्रिया केंद्र येथून औद्योगिक, जैविक आणि प्लास्टिक मातीत मिसळत नसून ते नदी/खाडी किंवा व पाण्याचे स्रोतामध्ये पोहचून प्रदूषण होत नाही. देवनार क्षेपणभूमी येथे उच्च न्यायालयाव्दारे स्थापित सनियंत्रण समितीच्या मार्गदर्शनाखाली परिरक्षण व सुरक्षेच्या दृष्टीने विविध उपाययोजना करण्यात येतात व त्यानुसार प्लास्टिकमुळे पाण्याच्या स्रोतामध्ये प्रदूषण होत नाही.

(६) व (७) सद्यस्थित कांजूर घनकचरा प्रक्रिया केंद्र येथे मुंबईतुन संकलीत होणाऱ्या सुमारे ६६०० मे. टन कचऱ्यापैकी सुमारे ६००० मे. टन एवढ्या कचऱ्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया केली जाते.

उर्वरीत केवळ ६०० मे. टन कचऱ्याची देवनार क्षेपणभूमी येथे आवश्यक उपाययोजना करुन विल्हेवाट लावण्यात येते. सदर प्रकल्पामध्ये सुमारे ६०० मेट्रीक टन प्रतिदिन कचऱ्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करुन सुमारे ८ मेगावॅट (MW) पर्यंत वीजनिर्मिती होणार आहे. सदर प्रकल्पाचे बांधणी व उभारणीचे काम प्रगती पथावर असून प्रकल्प ऑक्टोबर २०२५ मध्ये कार्यान्वित होणे अपेक्षित आहे.

-----------------

## छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण आणि मानव विकास संस्थेकडून घरभाडे भत्ता आणि आकस्मिकता निधी वितरीत करणेबाबत

**(७) * ३४१२ श्री.संजय खोडके, श्री.विक्रम काळे, श्री.संदीप जोशी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण आणि मानव विकास (सारथी) संस्थेकडून सन २०२१ व २०२२ मधील विद्यार्थ्यांना विद्यापीठ नोंदणी दिनांकापासून १०० टक्के दराने अधिछात्रवृत्ती सरसकट मंजूर करण्यात यावी असे निवेदन दिनांक ०५ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने मंजूर केलेल्या छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती योजना (CSMNRF) सन २०२१ -२०२२ चे विद्यार्थी नोंदणी दिनांकापासून अधिछात्रवृतीसाठी वारंवार मागणी

करून सुद्धा अद्यापही त्यांना अधिछात्रवृत्ती मिळालेली नसून विद्यार्थ्यांना विद्यापीठ नोंदणी दिनांकापासून अधिछात्रवृती मिळावी, या मागणीसाठी सर्व संशोधक विद्यार्थी चार वर्षांपासून शासनाकडे मागणी करित असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण आणि मानव विकास संस्थेमार्फत दिनांक २६ सप्टेंबर, २०२४ व दिनांक ६ ऑक्टोबर, २०२४ रोजी सुधारित प्रस्ताव शासनास पाठविण्यात आले असून त्यानुसार छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती योजना (CSMNRF) सन २०२१-२०२२ च्या सर्व अधिछात्रवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांना नोंदणी दिनांकापासून अधिछात्रवृत्ती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) पुणे या संस्थेतील विद्यार्थ्यांना गत आर्थिक वर्षात सन २०२४-२५ मध्ये माहे जानेवारी ते डिसेंबर या कालावधीतील घरभाडे भत्ता व आकस्मिक निधी अद्यापपर्यंत वितरीत करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सारथीच्या सन २०१९ -२३ या बॅचमधील सुमारे २ हजार पीएचडी संशोधक विद्यार्थ्यांना माहे जून ते डिसेंबर, २०२४ या कालावधीतील शिष्यवृत्तीची रक्कम मिळाली नाही तसेच ९६९ संशोधक विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली असतानाही निधीअभावी विद्यार्थ्यांचे संशोधन थांबले असून प्रयोगशाळा खर्च, डाटा संकलन, प्रवास, अभ्यास साहित्य, उपकरणे इ.बाबत आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, शासनाने सदर प्रकरणाची त्वरीत दखल घेवून निधीची तरतूद करून या संशोधक विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती तातडीने देणेबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) हे अंशत: खरे आहे.

व्यवस्थापकीय संचालक, छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण आणि मानव विकास (सारथी) यांच्या दिनांक ०६/१०/२०२४ च्या पत्रान्वये सारथी संशोधक विद्यार्थी कृती समितीचे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, दिनांक ३०/१०/२०२३ मधील तरतूदीनुसार छत्रपती शाहू महाराज संशोधन अधिछात्रवृत्ती योजनेतंर्गत (CSMNRF) सन २०२१-२०२२ च्या सर्व अधिछात्रवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (UGC)अधिछात्रवृत्ती देण्यासंदर्भातील निकषानुसार अधिछात्रवृत्ती देण्यात येत आहे.

(४) हे खरे नाही.

छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) पुणे या संस्थेमार्फत सन २०१९ ते २०२२ या कालावधीतील निवड केलेल्या संशोधक विद्यार्थ्यांना सन २०२४-२५ या वर्षातील माहे जानेवारी ते डिसेंबर या कालावधीतील घरभाडे भत्ता व आकस्मिक निधी वितरीत करण्यात आला आहे.

(५) हे खरे नाही.

छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) पुणे या संस्थेमार्फत मार्च २०२५ पर्यंत सन २०१९ ते २०२३ या बॅचमधील सर्व पात्र संशोधक विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्तीकरीता २२६.७८ कोटी निधी वितरीत केला आहे

(६) छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) पुणे या संस्थेस आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये विविध योजना राबविण्यासाठी रुपये ३०० कोटीची तरतूद करण्यात आली आहे. त्यापैकी नियोजन विभागाच्या दिनांक २० मे, २०२५ च्या आदेशान्वये रुपये ९० कोटी संस्थेस वितरीत करण्यात आला आहे.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यात मद्य विक्री परवाने मंजूरीत कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार करण्यात आल्याबाबत

**(८) * २५७७ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील दारुबंदी उठविल्यानंतर गत साडेतीन वर्षात नव्याने दारु दुकानांचे परवाने मंजूर करताना राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याच्या तक्रारी शासनाकडे करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंद्रपूर येथे दारुबंदीपूर्वी ३१५ परवाने होते परंतु, सद्य:स्थितीत ७५० दारु दुकानांना परवानगी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मद्य परवाने मंजूरीत कोट्यवधीचा गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

दारुबंदी होण्यापूर्वी दिनांक ३१/०३/२०१५ रोजी चंद्रपूर जिल्ह्यात एकूण ५१९ अनुज्ञप्ती कार्यरत होत्या. सद्य:स्थितीत दिनांक ३१/०३/२०२५ रोजी चंद्रपूर जिल्ह्यात एकूण ८४६ अनुज्ञप्ती कार्यरत आहेत.

(३) प्रस्तुत प्रकरणी प्राप्त तक्रारीबाबत सखोल चौकशी करुन अहवाल सादर करण्याकरीता गृह विभागाच्या दिनांक १५/१०/२०२४ च्या शासन निर्णयानुसार विशेष तपास पथक (SIT) गठीत करण्यात आले आहे. सदर विशेष तपास पथकास अहवाल सादर करण्याकरीता दिनांक ३१/०७/२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारितील रुग्णालयांच्या खाजगीकरणाच्या प्रस्तावाबाबत

**(९) * २२७३ श्री.सुनिल शिंदे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने, श्री.श्रीकांत भारतीय, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारित असलेले बोरिवली, मुंबई येथील हरिलाल भगवती रुग्णालयासह वांद्रे येथील के. बी. भाभा रुग्णालय, बोरिवली येथील सावित्रीबाई फुले रुग्णालय, मुलुंड येथील एम. टी. अग्रवाल रुग्णालय आणि गोवंडी येथील पंडित मदनमोहन मालविय शताब्दी रुग्णालय ही पाचही गरीब व गरजू रुग्णांसाठी आधार ठरत असून, सदर रुग्णालयांच्या खाजगीकरणाचा प्रस्ताव बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विचाराधीन असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रस्तावामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांवर बेरोजगाराची समस्या उद्भवणार असून गरीब रुग्णांना परवडणाऱ्या दरात उपचार मिळणे दुरापास्त होणार असल्याची बाब माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उपनगरी रुग्णालयांमधील १२ अतिदक्षता विभाग (आयसीयु) हे सार्वजनिक खाजगी भागीदारी (पीपीपी) तत्वावर चालविण्याचा निर्णय बृहन्मुंबई महानगरपालिकेने माहे एप्रिल, २०२५ मध्ये घेतला असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जोगेश्वरी ट्रॉमा रुग्णालयाचा एनआयसीयू विभाग पीपीपी तत्वावर चालविण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येत असून रुग्णालयात डॉक्टरांची उपस्थिती नसल्यामुळे ४८ तासांसाठी हा विभाग बंद ठेवावा लागल्याने रुग्णांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर आयसीयू विभाग पीपीपी तत्वावर चालविण्यास तज्ज्ञांकडून विरोध होत असतानाही याकरीता खाजगी कंत्राटदारांना रुपये ३७ कोटी ९ लाख ८ हजार ७२० एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेने घेतलेल्या या निर्णयास विरोध होत असून रुग्णालयांचे होत असलेले खाजगीकरण रोखण्याबाबत व रुग्णांच्या हिताच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत श्री.हरिलाल भगवती रुग्णालय बोरिवली (प), यांच्या सार्वजनिक खाजगी सहभाग प्रकल्पांतर्गत निविदा मागविण्यात आल्या होत्या. तथापि, या निविदेस स्थगिती देण्यात आली आहे.

पंडित मदनमोहन मालविय शताब्दी रुग्णालय, गोवंडी (पूर्व), रुग्णालयाच्या परिसरात सार्वजनिक खाजगी सहभाग प्रकल्पांतर्गत वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्यासाठी स्वारस्य अभिरुची मागविण्यात आल्या आहेत.

वांद्रे येथील के.बी.भाभा रुग्णालय, बोरिवली येथील सावित्रीबाई फुले रुग्णालय, मुलुंड येथील एम.टी. अग्रवाल रुग्णालय यांच्या खाजगीकरणाबाबत कोणताही प्रस्ताव महानगरपालिकेच्या विचाराधीन नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

महानगरपालिकेच्या १६ उपनगरीय रुग्णालयांपैकी १२ उपनगरीय रुग्णालयात अतिदक्षता विभागाच्या एकूण १५३ रुग्णशय्यासाठी तज्ञ डॉक्टरांच्या सेवा खाजगी संस्थेमार्फत उपलब्ध करुन

घेण्यासाठी निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.
(४) दिनांक ०३/०३/२०२५ रोजी डॉक्टर उपलब्ध नसल्यामुळे जोगेश्वरी ट्रॉमा रुग्णालयातील एम.आय.सी.यू. विभाग बंद ठेवण्यात आला होता.
(५) हे खरे नाही.

१२ उपनगरीय रुग्णालयातील एकत्रीत १५३ रुग्णशय्या कार्यन्वित ठेवण्यासाठी प्रति रुग्णशय्या प्रति दिवस रुपये ३३६७/- अंदाजित दर ठरवून पुढील २ वर्षाच्या कालावधीसाठी अंदाजित रुपये ३३ कोटी ५ लाख ५ हजार २०० रु खर्च अपेक्षित आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील घरांच्या किंमती नियंत्रणात ठेवण्यासाठी गृहनिर्माण धोरण ठरविण्याबाबत

**(१०) * २४६९ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाचे गृहनिर्माण धोरण नसल्याने व रेडीरेकनरच्या दरात वाढ करण्याच्या शासनाने घेतलेल्या निर्णयामुळे मुंबईतील घरांच्या किंमती सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेर गेल्या असून राज्याचे नोंदणी महानिरीक्षक व नोंदणी नियंत्रकाच्या आदेशानुसार सन २०२२-२३ नंतर राज्यातील घरे खरेदी - विक्रीचे व्यवहार महागणार असून रेडीरेकनर दरात सरासरी ४.३९ टक्केने वाढ केल्याने नोंदणी आणि मुद्रांक शुल्कात वाढ झाली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिका क्षेत्रात (मुंबई वगळता) रेडीरेकनर दरात सरासरी ५.९५ टक्क्यांनी वाढ झाली तसेच ग्रामीण भागात ३.३६ टक्क्यांनी रेडीरेकनर दरात वाढ केल्याने सर्वसामान्यांच्या घराच्या किमती वाढणार असून याचा थेट परिणाम घर खरेदी करणाऱ्या मध्यमवर्गीयांवर होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई शहरात विकासकांना इमारत बांधकामासाठी येणारा खर्च व त्यांनी विक्रीसाठी आकारलेली किंमत यात मोठ्या प्रमाणात तफावत असून या तफावतींचा ३० टक्के नफा विकासकांना होतो तोच पाच ते दहा टक्केच असणे व्यावहारिक ठरते यासाठी शासनाने धोरण ठरविण्याची मागणी सर्वसामान्य जनतेतून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रत्येकाला घर असावे यासाठी केंद्र शासनाने धोरण जाहीर करुन पंतप्रधान आवास योजना ही अंमलात आणली परंतु, महानगरामध्ये या पंतप्रधान आवास योजनेंतर्गत स्वस्त व परवडणारे घर मिळणे दुरापास्त होत असल्याने सदर योजनेची अंमलबजावणी शासनाकडून होत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, मुंबईत विकासक प्रचंड नफेखोरी करून घरे विकत असल्याने घरे विकत घेणे सामान्य जनतेच्या आवाक्याबाहेर होत चालले असल्याने घरांच्या किंमती सामान्य जनतेला परवडणाऱ्या असाव्यात, अशी मागणी मुंबईकर जनतेकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, शासनाकडून रेडीरेकनरच्या दर वाढीमुळे घरांच्या किंमतीत वाढ होणार नाही अशी ग्वाही दिली जात असतानाही प्रत्यक्षात घरांच्या किंमती वाढलेल्या असून मुंबईतील घरांच्या किंमती नियंत्रणात ठेवण्यासाठी रेडीरेकनर दर कमी करुन तसेच व्यावहारिक गृहनिर्माण धोरण ठरविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) राज्याचे गृहनिर्माण धोरण, २०२५ प्रसिध्द करण्यात आले आहे. वार्षिक मूल्यदर तक्ते हे मुद्रांक अधिनियम,१९५२ व त्यास अनुसरून असलेल्या मुद्रांक नियम,१९९५ मधील तरतूदीनुसार प्रत्येक वर्षी सुधारीत करणेची कार्यवाही पार पाडली जाते. सन २०२२-२३ नंतर तीन वर्षांनंतर म्हणजेच सन २०२५-२६ मध्ये वार्षिक मूल्यदर तक्ते सुधारीत करणेत आले आहेत. त्यामध्ये मुंबई शहरासाठीची सरासरी वाढ ४.३९ % इतकी आहे.

(२) पूर्ण राज्याचे वार्षिक मूल्यदर तक्त्यातील दर हे सलग तीन वर्ष स्थिर ठेवल्यामुळे सदरची वाढ ही तीन वर्षांची ठरते व ती प्रत्यक्ष बाजारात असलेल्या प्रचलित दरापेक्षा खुपच कमी आहे. अधिनियमातील तरतूदीनुसार बाजारभावाप्रमाणे मुद्रांक शुल्क आकारणी करण्यात येते. त्यानुसार मागील तीन वर्षात झालेले खरेदी-विक्री व्यवहार विचारात घेऊन मुद्रांक शुल्क आकारणी करण्यात आली आहे.

(३) बांधकामाचे दर हे शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्रत्येक वर्षी निश्चित केले जातात व असे निश्चित केलेले दर प्रती वर्षी बांधकाम विभागाकडून महसूल व वन विभागास उपलब्ध करुन दिले जातात. मागील वर्षाच्या उपलब्ध खरेदी-विक्री व्यवहारानुसार खुल्या जमिनीचा दर, सदनिकेचा दर इत्यादी दर निश्चित करण्यात येत असल्याने ते प्रत्यक्ष बाजारात होत असलेल्या व्यवहाराशी निगडीत असतात.

सद्य:स्थितीत बांधकामासाठी लागणाऱ्या सिमेंट, स्टिल, विटा, वाळू इत्यादी साहित्याच्या दरामध्ये वाढ झालेली आहे. तसेच वस्तु व सेवा कर, कामगार उपकर (लेबर सेस), स्वामित्व धन (रॉयल्टी), विमा तसेच, वैधानिक परवानग्यांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थाकडून आकारण्यात येणारे शुल्क इत्यादीमध्ये झालेल्या वाढीमुळे देखील राज्यात मुंबईसह इतर शहरातील सदनिकांच्या किंमतीमध्ये सातत्याने वाढ होत आहे.

(४) प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत ५,१८,६६६ घरकुले मंजूर करण्यात आली आहेत. तसेच कर्ज संलग्न व्याज अनुदानाच्या माध्यमातून (CLSS अंतर्गत) ६,२५,०५० घरकुले मंजूर आहेत, असे राज्यात एकूण ११,४३,७१६ घरकुलांना प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत मंजुरी प्राप्त आहे. त्यापैकी ४,४२,७४८ घरकुले आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी (EWS) आहेत.

याव्यतिरिक्त प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० अंतर्गत जून,२०२५ मध्ये ३७,९६२ नवीन घरकुलांना मंजुरी देण्यात आली आहे.

(५) व (६) बाजारात प्रचलित असलेल्या दरानुसार वार्षिक मूल्यदर तक्त्यामध्ये दर निश्चित करण्यात येतात. प्रत्यक्ष खरेदी-विक्री व्यवहारानुसार (बाजारातील प्रत्यक्ष व्यवहार) येणाऱ्या टक्केवारीपेक्षा वार्षिक मूल्यदर तक्त्यासाठी निश्चित केलेली टक्केवारी ही अल्प प्रमाणात आहे.

म्हाडा प्राधिकरणांतर्गत सन २०२४ मध्ये मुंबईत एकूण २०३० सदनिकांची सोडतीमार्फत विक्री करण्यात आली आहे. सदर सदनिकांची विक्री किंमत ही खुल्या बाजारभावापेक्षा अंदाजे ३०% ते ४०% पेक्षा कमी होती.

म्हाडा प्राधिकरणामार्फत विविध प्रवर्गांकरीता गृहनिर्माण प्रकल्प राबविण्यात येऊन, सोडतीमार्फत परवडणारी घरे सर्वसामान्य जनतेकरीता माफक दरात उपलब्ध करून दिली जातात. तसेच, २० % सर्वसमावेशक योजनेतील प्राप्त सदनिकांची विक्री बांधकामाचा रेडीरेकनर दर अधिक २५ % या दराने केली जाते.

-----------------

## ठाणे महानगरपालिकेने जाहीर केलेल्या पर्यावरण अहवालाबाबत

**(११) * २४५८ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरात गाड्यांचे मोठमोठ्याने वाजणारे हॉर्न, वाहतूक कोंडी, बांधकाम क्षेत्रावरील गोंगाट तसेच मोठ्या आवाजात गाणी वाजवणे इ.कारणास्तव ध्वनीप्रदूषणात वाढ झाल्याचे ठाणे महानगरपालिकेने जाहीर केलेल्या पर्यावरण अहवालात नमूद असल्याची बाब माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत ठाणे शहरातील हवेच्या गुणवत्तेचा निर्देशांक १३५ वर पोहोचला असून धुलीकणाचे प्रमाण १५२ टक्क्यांपर्यंत गेले असल्याचे पर्यावरण अहवालात नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हवा प्रदूषण रोखण्यासाठी प्रशासनाकडून विविध उपाययोजना हाती घेतल्यानंतर देखील प्रदूषण रोखण्यास ठाणे महानगरपालिकेस यश आले नसून ठाणे जिल्ह्यातील हवेच्या प्रदूषणाचा आलेख कमी होण्याऐवजी उंचावल्याने चिंता व्यक्त केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ठाणे महानगरपालिकेने जाहीर केलेल्या पर्यावरण अहवालातील ध्वनीप्रदूषणविषयक त्रुटी दुर करणे तसेच हवा व ध्वनी प्रदूषण रोखण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

माहे नोव्हेंबर, २०२४ मध्ये हवेच्या गुणवत्तेचा निर्देशांक १३५ आढळलेला आहे.तसेच धुळीकणाचे प्रमाण १५२ ug/m३ आढळलेला आहे,असे पर्यावरण अहवालात नमूद केले आहे. सद्य:स्थितीत हवा गुणवत्ता निर्देशांक ४७ (समाधानकारक) आहे.

(३) खरे नाही.

ठाणे शहराची सन २०२४-२५ ची हवा गुणवत्ता सन २०१७-१८ च्या तुलनेत २४% सुधारली आहे, असे केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने नमुद केले आहे.

(४) ध्वनी प्रदूषण व हवा प्रदूषण रोखण्यासाठी ठाणे महानगरपालिकेकडून खालील उपाययोजना केलेल्या आहेत.

- १२३ ई-बस खरेदी करण्यात आलेल्या आहेत.
- Machinical Dust Sweeping द्वारे प्रतिदिन काही भागात रस्त्याची साफसफाई करण्यात येते.

• महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी करणे बांधकाम व्यावसायिकांना तसेच METRO, MMRDA, MSRDC व सार्वजनिक बांधकाम विभाग यांना बंधनकारक करण्यात आली आहे.

• ताडपत्री नसलेल्या डेब्रिज वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कार्यवाही करण्यासाठी दक्षता पथक स्थापन करण्यात आले.

• ठाणे महानगरपालिकेतर्फे गतवर्षी १२५००० झाडे लावण्यात आली. यामध्ये २५००० बांबुच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. तसेच सन २०२५ मध्ये २ लाख झाडे लावण्याचे उद्दिष्ट ठेवलेले आहे. त्यापैकी आतापर्यंत २२००० झाडांची लागवड करण्यात आली आहे.

• ठाणे महानगरपालिकेने उघड्यावर पालापाचोळा कचरा, प्लास्टिक जाळण्याबाबत बंदी केली असून त्याबाबत काटेकोरपणे अंमलबजावणी होत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंबेलोहळ (ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर) येथील नागझरी नदीवर पूल बांधणेबाबत

**(१२) * २४३२ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंगापूर तालुक्यातील (जि.छत्रपती संभाजीनगर) मौजे अंबेलोहळ ते गवळी शिवरा ह्या वाहतुकीच्या रस्त्याच्या मधोमध नागझरी नदी वाहत असून नदीचे खोलीकरण, रुंदीकरण सीएसआर (Corporate Social Responsibility) च्या माध्यमातून जानकीदेवी बजाज संस्थेमार्फत करण्यात आले असून नदीची खोली मोठ्या प्रमाणावर वाढली असल्यामुळे शेतकऱ्यांना ये-जा करण्यासाठी समस्या उद्भवत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नदीच्या खोलीकरणामुळे त्यातील मातीचा भराव आजूबाजूला टाकल्यामुळे संबंधित गावकऱ्यांचा रस्ता बंद झाल्यामुळे गावकऱ्यांना अनेक समस्यांचा त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने परिसरातील शेतकऱ्यांना व तेथील नागरिकांना दळण-वळणाकरीता उक्त भराव काढून त्याठिकाणी रस्ता तयार करुन नागझरी नदीवर पुलाचे बांधकाम करणे आवश्यक असल्यामुळे उक्त नदीवर पुलाचे बांधकाम करणेसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१), (२) व (३) मौजे आंबेलोहोळ ते गवळी शिवरा असा थेट रस्ता नसून आंबेलोहोळ ते गवळीशिवरा जाण्यासाठी दोन मार्ग आहेत. पहिला मार्ग आंबेलोहोळ (ग्रामा ५८) वडगाव (ग्रामा ५७) (प्रजिमा ३१) गवळी धानोरा, गवळीशिवरा (इजिमा ५४) असा आहे. तसेच दुसरा मार्ग आंबेलोहोळ ते टोकी (ग्रामा १४१) व टोकी ते प्रजिमा-३१ हा ग्रामा ५९ तसेच प्रजिमा-३१ ते गवळीशिवरा (इजिमा-५४) असा आहे. यातील एक मार्ग आंबेलोहोळ गावाजवळून वडगावला नागझरी नदीच्या तीरावरुन जातो (ग्रामा-५७). त्याठिकाणी नागझरी नदीच्या खोलीकरण, रुंदीकरण सीएसआर च्या माध्यमातून जानकीदेवी बजाज या संस्थेमार्फत करण्यात आले असून नदीची खोली वाढली आहे. नदीच्या

दुसऱ्या तीरावरुन आंबेलोहोळ ते टोकी हा रस्ता ग्रामा-१५९ जातो. सध्यस्थितीत या दोन्ही रस्त्यावरुन वाहतूक सुरळित चालू आहे. तसेच आंबेलोहोळ या गावात जाण्यासाठी प्रजिमा ३२ वर नागझरी नदीवर चांगल्या स्थितीतील मोठा पूल आहे.

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून टोकी ते प्रजिमा-३१ ग्रामीण मार्ग ५९ वर सा.क्र.०/५१८ व ०/६८० येथे अनुक्रमे २२ मी. व ४९ मी. पुलांचे बांधकाम प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पारगाव हिल (ता.पनवेल, जि.रायगड) येथील मॉनिटरिंग ॲण्ड अर्ली वॉर्निंग सिस्टिम बसविण्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(१३) * २६०२ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळालगत असलेल्या पुष्पक नोड जवळील पारगाव हिल (ता.पनवेल, जि.रायगड) येथे वारंवार होणाऱ्या भूस्खलनामुळे होणारी वित्तहानी तसेच जिवित हानी टाळण्यासाठी सिडकोने संभाव्य आपत्तीची आगाऊ सूचना देणारी यंत्रणा (सिडको मॉनिटरिंग ॲण्ड अर्ली वॉर्निंग सिस्टिम) ३०० मीटर पर्यंत लावली असून उर्वरित ४०० मीटरपर्यंत ही सिस्टीम बसविण्याचे काम अर्धवट सोडल्यामुळे स्थानिक रहिवाशांच्या जीवितास धोका निर्माण झाला असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिडकोने बसविलेल्या ह्या यंत्रणेद्वारे भूस्खलनामुळे होणारी दुर्दैवी घटना टाळण्यास मदत होणार असून सदर योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सिडकोने मॉनिटरिंग ॲण्ड अर्ली वॉर्निंग सिस्टिमचे काम अपूर्णावस्थेत ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळालगत पुष्पक नोड जवळील पारगाव हिल (ता.पनवेल, जि.रायगड) येथे वारंवार होणाऱ्या भूस्खलनास अटकाव करण्याच्या उपाययोजनेसाठी सिडकोकडून M/s. Geostruct Engineering Solutions या सल्लागाराची नेमणूक दिनांक २७/०५/२०१९ रोजी करण्यात आली होती. सल्लागाराने सूचविलेल्या उपाययोजनेचे अंदाजपत्रक भारतीय तंत्रज्ञान संस्था, मुंबई (IIT Bombay) यांच्याकडून पडताळणी करण्यात आले. त्यानुषंगाने दिनांक ४/०१/२०२४ रोजी ई-निवीदा मागवून सदर काम मे.गरवारे टेकनिकल फायबर्स लि. यांना दिनांक १५/०३/२०२४ रोजी प्रदान करण्यात आले. सदर कंपनीने पारगाव हिल येथील चेनेज (CH) ०.० ते १८०.० मी. आणि चेनेज (CH) ४४०.० ते ६२०.० मी. या अतिसंवेदनशील भागात (जास्त रहदारीयुक्त क्षेत्र) प्रथमत: जाळी व मॉनिटरिंग ॲण्ड अर्ली वॉर्निंग सिस्टिम बसविण्याचे काम पूर्ण केले आले.

भारतीय तंत्रज्ञान संस्था, मुंबई (IIT Bombay) यांनी प्रमाणित केल्याप्रमाणे वाढीव क्षेत्रामुळे कराव्या लागणाऱ्या उर्वरित कामाची किंमत मूळ किंमतीच्या सुमारे ३७% पेक्षा जास्त होत असल्याने सदरचे वाढीव काम नव्याने ई-निविदा मागवून करण्याचे ठरविण्यात आले त्यानुसार उर्वरित चेनेज (CH)

१८०.० ते ४४०.० मी. या भागामध्ये प्रथमत: जाळी व मॉनिटरिंग ॲण्ड अर्ली वॉर्निंग सिस्टिम बसविण्यासाठी दिनांक ८/०४/२०२५ ते दिनांक ५/०५/२०२५ या कालावधीसाठी ई-निविदा मागविण्यात आल्या. पात्र निविदाधारकांची आर्थिक बोली दिनांक १८/०६/२०२५ रोजी उघडण्यात आली असून न्युनतम बोलीधारक (L१) M/s. Rhoda Cognax Pvt. Ltd. यांना कार्यादेश देऊन उर्वरित काम सुरु करण्यात येत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## स्विगी, ब्लिंकिट, झोमॅटो, झेप्टो, इंस्टामार्ट या कंपन्यांच्या गोदामांचे भरारी पथकाकडून लेखापरिक्षण करण्याबाबत

**(१४) * २७७५ श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्विगी, ब्लिंकिट, झोमॅटो, झेप्टो, इन्स्टामार्ट सारख्या जलद व्यापार देणाऱ्या कंपन्यांच्या गोदामांमध्ये झुरळ, उंदीर इत्यादींचा उपद्रव झाला असून अन्न पदार्थ हे विखुरलेल्या अवस्थेत पडले असून सदर गोदामांचे अन्न व औषध प्रशासनाकडून वेळोवेळी लेखापरीक्षण (ऑडीट) होत नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कंपन्यांच्या माध्यमातून अन्न पदार्थांची घरपोच सेवा (ऑनलाईन) देत असताना गोदामांमध्ये निकृष्ट दर्जाच्या अन्न पदार्थांच्या पिशव्या तसेच कालबाह्य झालेले दूध आणि खाद्य पदार्थांवर नव्याने लेबल लावून त्याची घरपोच सेवा उपलब्ध करीत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंपन्यांच्या गोदामाचे भरारीपथकामार्फत वेळोवेळी लेखापरिक्षण (ऑडिट) करून आरोग्यास हानिकारक ठरणाऱ्या वस्तू नष्ट करण्याबाबत तसेच सदर प्रकरणी दोषी असणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

अन्न व औषध प्रशासनाकडून करण्यात आलेल्या तपासणीमध्ये एका ठिकाणी मुदतबाह्य अन्न पदार्थ आढळून आले. मुदतबाह्य अन्न पदार्थ विक्रीसाठी ठेवल्याचे निदर्शनास आल्याने संबंधित आस्थापनेविरुध्द न्यायनिर्णय प्रकरण दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. परंतु, मुदतबाह्य झालेले दूध आणि खाद्यपदार्थांवर नव्याने लेबल लावून त्याची विक्री करीत असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) अन्न व औषध प्रशासनाकडून माहे एप्रिल, २०२५ ते माहे जून, २०२५ या कालावधीत राज्यात अन्नपदार्थांची घरपोच सेवा (ऑनलाईन) देत असलेल्या एकूण ४३ अन्न आस्थापनांच्या तपासण्या करण्यात आल्या असून एकूण ३२ अन्न नमुने विश्लेषणासाठी पाठविण्यात आले आहेत. तपासण्या करण्यात आलेल्या एकूण ४३ अन्न आस्थापनांविरूध्द अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ व नियमन, २०११ मधील तरतूदीनुसार कारवाई करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील सार्वजनिक बांधकाम खात्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी बेकायदेशीररित्या कामांना मंजूरी दिल्याबाबत

**(१५) * २८१७ अ‍ॅड.अनिल परब, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.सचिन अहिर, श्री.संजय खोडके :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सार्वजनिक बांधकाम खात्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी बेकायदेशीररित्या कामांना मंजूरी देऊन कोटयवधी रुपयांची शासनाची फसवणूक करुन स्वत:च्याच खात्यात पैसे जमा केल्याचे कॅगच्या अहवालात नमूद केल्याचे भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी शासनाच्या इतर विभागांसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इमारती, उडडाणपुल, रस्त्यांबाबतच्या कामांतून मिळणाऱ्या शुल्काची निम्मी रक्कम स्वत:साठी घेत असल्याची बाब माहे एप्रिल,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कॅगने राज्यातील कोणकोणत्या कामात शासनाची फसवणूक केल्याचे अहवालात नमूद केले आहे, त्याप्रमाणे शासनाने या सर्व प्रकरणी चौकशी करुन संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली तसेच संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांच्या बँक खात्यात पैसे जमा केले असल्याने ते वसुल करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे खरे नाही.

(२) सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत कार्यान्वित करण्यात येणाऱ्या कामासाठी कोणतेही शुल्क आकारण्यात येत नाही. तथापि, अन्य विभागाकडून कार्यान्वित करण्यात येणाऱ्या कामांच्या तपासणीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत शुल्क आकारण्याची तरतूद महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावलीमध्ये उपलब्ध आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावलीतील तरतूदीनुसार शुल्क वाटपाबाबत सन २००४ व २०१९ मध्ये सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी करण्यात आलेल्या लेखापरिक्षण दरम्यान महालेखाकार, नागपूर यांनी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत निर्गमित करण्यात आलेल्या दिनांक २५ फेब्रुवारी, २०१९ च्या शासन निर्णयावर आक्षेप उपस्थित केलेला आहे, ही वस्तुस्थिती आहे.

जलसंपदा विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फतही अशाप्रकारे शुल्क आकारणी व वाटप करण्याची कार्यवाही करण्यात येते.

(३) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावलीतील तरतूदीनुसार शुल्क वाटपाबाबत कार्यवाही केली असल्याने दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तथापि, महालेखाकार, नागपूर यांच्या आक्षेपास अनुसरुन व शासनाच्या विविध विभागांच्या शुल्क आकारणी व वाटप यांच्या नियमावलीमध्ये एकसूत्रता आणण्याचे दृष्टीने शासन स्तरावर समिती नेमण्याची बाब विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर येथील जगजीवनराम नगर व मोदी परिसरातील दोन शाळकरी मुलींचा दूषित पाण्यामुळे मृत्यू झाल्याबाबत

**(१६) * २६५४ श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील जगजीवनराम नगर, मोदी परिसर येथे राहणाऱ्या दोन शाळकरी मुलींचा दूषित पाणीपुरवठ्यामुळे मृत्यू झाल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर महानगरपालिकेंतर्गत शहरातील दूषित पाणीपुरवठ्याचा रोबोट व कॅमेरामशीन द्वारे शोध घेतला असता सुमारे ३९ ठिकाणी जलवाहिनी व ड्रेनेजलाईन एकत्र असून ड्रेनेजमधून जलवाहिनी टाकल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सोलापूर शहरातील जगजीवनराम नगर, मोदी परिसरास स्वच्छ पाणीपुरवठा होण्याच्या दृष्टीने जुन्या व जीर्ण झालेल्या ड्रेनेजलाईन बदलण्याबाबत व पिण्याच्या पाण्याच्या पाईपलाईन वेगळया करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सोलापूर शहराच्या पर्यावरणाच्या दृष्टीने महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या सिद्धेश्वर तलावातील जलप्रदूषण वाढल्यामुळे सदर तलावातील सुमारे हजारो मासे मृत्यूमुखी पडले तसेच एकाच वेळी ५५ कासवांचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक ११ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त ठिकाणी होणारे जलप्रदूषण नियंत्रित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) तसेच सदर प्रकरणी जबाबदार असणाऱ्या सोलापूर महानगरपालिकेतील संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

सोलापूर महानगरपालिका क्षेत्रातील बाबू जगजीवनराम झोपडपट्टीमधील मोदी शिवाजीनगर भागात दोन शाळकरी मुलींचा अचानक जुलाब, उलटी होऊन दिनांक ०४-०४-२०२५ व दिनांक ०५-०४-२०२५ रोजी मृत्यू झाला असल्याचे निदर्शनास आले आहे.

तथापि, प्राप्त शवविच्छेदन अहवालानुसार सदरचा मृत्यू जलजन्य जिवाणूमुळे झालेला नाही.

(२) होय, हे अंशतः खरे आहे.

शहरातील गावठाण, झोपडपटटी व दाट लोकवस्तीच्या काही भागात दूषित पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी सोलापूर महानगरपालिकेला प्राप्त झाल्या होत्या. त्याअनुषंगाने पिण्याच्या पाईप लाईनमध्ये मिसळणारे दूषित पाणी शोधणेकरीता अत्याधुनिक यंत्रणा म्हणून इंडोस्कोपी मशिनचा वापर करुन बऱ्याच ठिकाणी दूषित पाण्याच्या तक्रारीचे निराकरण करण्यात आलेले आहे. तसेच ज्या ठिकाणी पाईप लाईन अत्यंत जीर्ण व जुन्या झालेल्या आहेत त्या ठिकाणी शासनाच्या विविध योजनेतून नवीन पाईप

लाईन टाकण्याची कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) सदर दुर्घटना घडण्यापूर्वी या भागामध्ये घाणपाणी अथवा दूषित पाणी येत असल्याबाबत त्या परिसरातील नागरिकांनी तक्रारी केल्या नसल्याचे सोलापूर महानगरपालिकेला त्यांच्याकडील उपलब्ध अभिलेखावरुन आढळून आले. तसेच प्रस्तुत घटना घडल्यानंतर दिनांक ०५/०४/२०२५ रोजी नागरीकांच्या घरातील पाण्याची ओटी टेस्ट (OT- Orthotolidine test) घेण्यात आली असून त्यानुसार पाणी पिण्यास योग्य असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच सदर झोपडपट्टी समोरील मुख्य रस्त्यावर ३०० मिमी व्यासाची नविन ड्रेनेज लाईन घालण्यात आलेली आहे. याच बरोबर अस्तित्वातील सर्व ड्रेनेज मॅनहोल मधील गाळ काढून मॅनहोलही साफ केलेले आहेत व आवश्यकतेनुसार देखभाल दुरुस्तीचे कामे करण्यात आलेले आहे. याशिवाय जलवितरण नलिकाचे वॉशआऊट करुन स्वच्छ पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

(४) होय, हे खरे आहे.

तथापि, सदर घटना दिनांक ८ मे २०२५ रोजी घडल्याचे निदर्शनास आले आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत श्री सिध्देश्वर तलावातील पाण्याची तपासणी करण्यात आलेली असून सदर अहवालानुसार पाण्यातील ऑक्सीजनचे प्रमाण मानांकनानुसार कमी असल्याचे आढळून आले आहे.

(५) सदर तलावाची मालकी हक्क हा पूर्णपणे श्री सिध्देश्वर देवस्थान समितीची असून सदर तलावाची देखभाल करण्याची संपूर्ण जबाबदारी श्री सिध्देश्वर देवस्थान समिती यांची आहे. तथापि, सोलापूर महानगरपालिकेमार्फत तात्काळ श्री सिध्देश्वर तलावातील पाण्याची तपासणी करण्यात आली व तलावात एरिएशन सिस्टिम चालू करण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी दिनांक २० मे, २०२५ रोजी सदर घटनेच्या अनुषंगाने तलावातील प्रदूषण रोखणेकामी संबंधित विभागाची बैठक आयोजित केली. सार्वजनिक बांधकाम विभागाने तलावातील पाण्याची गुणवत्ता सुधारण्यासाठी जिल्हा नियोजन समिती मार्फत नवीन वॉटर एरिएशन सिस्टीम बसविण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु केली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय संलग्नित सर्वोपचार रुग्णालय, अकोला येथील आहार विभागात अन्नसुरक्षा कायद्याचे उल्लंघन होत असल्याबाबत

**(१७) * २७६१ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय संलग्नित सर्वोपचार रुग्णालय, अकोला येथील आहार विभागाची अन्न व औषध प्रशासन विभागातील अधिकाऱ्यांनी तपासणी केली असता तेथे अन्नसुरक्षा कायद्याचे उल्लंघन, स्वच्छतेच्या निकषांकडे दुर्लक्ष, निकृष्ट दर्जाचे अन्न इ. त्रुटी अन्न औषध प्रशासनाच्या तपासणी पथकाकडून केलेल्या कारवाईतून माहे एप्रिल, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अन्नपदार्थांच्या नमुन्याच्या तपासणी अहवालातून कोणते निष्कर्ष प्राप्त झाले आहेत, त्यानुसार सदर अहवालातील त्रुटींची पूर्तता करुन रुग्णांच्या हिताचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने शासनाने

केलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय संलग्नित सर्वोपचार रुग्णालय, अकोला येथील आहार विभागातील अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ :** (१) व (२) अन्न व औषध प्रशासनाने दिनांक ११/०४/२०२५ रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अकोला या आस्थापनेची तपासणी केली. सदर तपासणीमध्ये १३ अन्न नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले. विश्लेषणासाठी घेण्यात आलेल्या सर्व १३ अन्न नमुन्यांचे विश्लेषण अहवाल अन्न विश्लेषक, अन्न चाचणी प्रयोगशाळा, नागपूर यांचेकडून प्राप्त झाले असून सर्व अन्न नमुने प्रमाणित घोषित झाले आहेत.

अन्न व औषध प्रशासनाने केलेल्या तपासणीत सदर आस्थापनामध्ये स्वच्छतेच्या निकषांचे उल्लंघन झाल्याचे आढळून आले नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण -डोंबिवली महानगरपालिकेच्या रुग्णालयात निष्काळजीपणामुळे महिलेचा मृत्यू झाल्याबाबत

**(१८) * ३१२२ श्री.मिलिंद नार्वेकर, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्रीमती चित्रा वाघ, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या रुक्मिणीबाई रुग्णालयात उपचारासाठी आलेल्या एका महिलेला पुढील उपचारासाठी कळवा येथील रुग्णालयात दाखल करण्यासाठी वेळेवर रुग्णवाहिका उपलब्ध न झाल्याने तिचा दुर्दैवी मृत्यू झाला असल्याची बाब दिनांक ७ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या कल्याण (पूर्व) येथील शक्तिधाम रुग्णालयात कुटुंब नियोजनाच्या शस्त्रक्रियेसाठी दाखल करण्यात आलेल्या एका तीस वर्षीय महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना माहे एप्रिल, २०२५ च्या दुसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी सुरू असून याबाबतचा अहवाल आल्यानंतर जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल तसेच आशा वर्कर यांना कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यासाठी शासनाकडून उद्दीष्ट देण्यात येते त्या दृष्टीने देखील तपास केला जाईल असे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांच्याकडून सांगण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर महिलेवरील उपचारात निष्काळजीपणा करणाऱ्या व मृत्यूस जबाबदार असलेल्या रुक्मिणीबाई रुग्णालय प्रशासन, संबंधित डॉक्टर व रुग्णवाहिका चालक यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणाची चौकशी सुरू असून, चौकशी अहवाल आल्यानंतर जे दोषी असतील त्यांच्यावर कार्यवाही करण्यात येईल, असे महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचेकडून सांगण्यात आले होते. तथापि, कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यासाठी आशा वर्कर यांना शासनाकडून टार्गेट देण्यात येते, अशा प्रकारचे कोणतेही व्यक्तव्य महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचेकडून करण्यात आलेले नाही, ही वस्तुस्थिती आहे.

(४) अशा प्रकरणी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक २६/०३/२०१० रोजीच्या शासन निर्णयान्वये, डॉक्टर / रूग्णालय यांचेकडून उपचारा दरम्यान हलगर्जीपणा झाला किंवा कसे, याबाबत तपास करण्यासाठी जिल्हा शल्यचिकित्सक यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे.

•कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील शक्तीधाम प्रसूतीगृह, कल्याण (पूर्व) येथील कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेसाठी दाखल करण्यात आलेल्या महिलेच्या मृत्यूबाबत जिल्हा शल्यचिकित्सक, ठाणे यांचेमार्फत चौकशी सुरू असून, चौकशीअंती संबंधितांवर कारवाई करण्याची तजविज ठेवण्यात आली आहे.

•तसेच, रूक्मिणीबाई रूग्णालय, कल्याण (प.) येथे रूग्णवाहिका वेळेत उपलब्ध न झाल्यामुळे महिलेचा मृत्यू झाला, त्याअनुषंगाने महानगरपालिकेने चौकशीअंती संबंधित सिस्टर इन्चार्ज व वाहनचालक यांचेवर निलंबनाची कार्यवाही केली आहे. तसेच, बाह्यसंस्थेमार्फत नियुक्त वैद्यकीय अधिकारी व परिचारीका यांना कामावरून कमी करण्यात आले आहे. तर संबंधित रूग्णालयाच्या प्रभारी मुख्य वैद्यकीय अधिकारी व प्रभारी वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांच्याकडून सदर घटनेच्या अनुषंगाने खुलासा मागविण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापुर जिल्ह्यात महामार्गावरील रस्ते दुभाजक तोडल्याने अपघातांचा धोका वाढला असल्याबाबत

**(१९) * ३३५८ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हा अनेक महामार्गांनी जोडला गेला असून वाढत्या वाहतुकीमुळे सोलापूर-पुणे, सोलापूर-हैद्राबाद, सोलापूर-धुळे, सोलापूर-अक्कलकोट या महामार्गांवर अनेक ठिकाणी शेतरस्ता, पेट्रोल पंप, हॉटेलकरिता यु टर्न साठी दुभाजक तोडलेले असून ते अपघातास व मृत्यूस कारणीभूत ठरत असल्याची बाब माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महामार्गावरील दुभाजक तोडल्यामुळे अपघातांचा धोका वाढला असून येथून दुचाकी, चारचाकीसह अन्य वाहने अनधिकृतपणे रस्ता ओलांडीत असल्यामुळे भीषण अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने आवश्यक ठिकाणी अंडरपास, दुभाजकांची निर्मिती करणे, तोडलेले दुभाजक दुरुस्त करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच दुभाजक बेकायदेशीरपणे

तोडलेल्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) सोलापूर जिल्ह्यातील एकूण ४ राष्ट्रीय महामार्ग भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडे असून त्यांची एकूण लांबी ६०१.५०४ कि.मी. आहे.

१) पुणे-सोलापूर ते कर्नाटक हद्द रा.म.क्र.६५ (२०१.३६ कि.मी.)
२) येडशी-सोलापूर-विजापूर रस्ता रा.म.क्र.५२ (२०७.७९२ कि.मी.)
३)बोरगांव-वाटंबरे-मंगळवेढा-सोलापूर रा.म.क्र.१६६(१५३.४० कि.मी.)
४) सोलापूर-अक्कलकोट रस्ता रा.म.क्र.१५०-E (३८.९५२ कि.मी.)

वरील सर्व महामार्ग हे उद्योजकाच्या करारनामा व आय.आर.सी.च्या मानकाप्रमाणे बांधण्यात आलेले असून महामार्गावरुन वाहतूक सुरळीत चालू आहे. तसेच सदर महामार्गावर होणारे अनधिकृत दुभाजक हे पेट्रोलिंग टिमच्या निदर्शनास येताच पोलीस प्रशासनाच्या मदतीने बंद करण्यात येतात. महामार्गावर २४×७ पेट्रोलिंग टिम तैनात असून, वाहतूक सुरळीत चालू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथील औषधी भांडाराला बनावट औषधांचा पुरवठा केल्याबाबत

**(२०) * ३२२९ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथील औषधी भांडाराला बनावट औषध पुरवठा केल्याप्रकरणी बेगमपुरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, सदर प्रकरणी अद्याप तपास पूर्ण करण्यात आला नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी बनावट औषधांचा पुरवठा करणारे व्यावसायिक व कारखानदार यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

शासकीय विश्लेषक, अन्न व औषध प्रशासन प्रयोगशाळा, छत्रपती संभाजीनगर यांच्या दिनांक २१/१२/२०२४ च्या अहवालानुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथून विश्लेषणार्थ घेण्यात आलेल्या ०५ औषध नमुन्यांपैकी ०१ औषध Curexim-२०० B.No SKS-C-५५१८ "Cefixime Tablets IP २००mg" Mfg By: M/s.Skycure Solutions, Kerla हे बनावट असून त्यामध्ये औषधांचा मूळ घटक नसल्याचे निष्पण झाले आहे. याप्रकरणी अन्न व औषध प्रशासनाने पुरवठादार व उत्पादक यांच्याबाबत प्रथामिक तपास केला असता उत्पादक अस्तितवात नसल्याचे निदर्शनास आले.

त्यामुळे औषध पुरवठा साखळीतील औषध पुरवठादार १. मे. विशाल इन्टरप्रायजेस, कोल्हापूर, २. मे. जेनेरीकएज, भिवंडी, ठाणे, ३. मे. काबीज जेनेरीक हाऊस, मिरा रोड, ४. मे. स्कायकेअर सोल्युशन, केरळ यांचेविरूध्द प्रथम खबर अहवाल क्र.००८४, दिनांक १६/०४/२०२५ रोजी बेगमपुरा पोलीस स्टेशन, छत्रपती संभाजीनगर येथे दाखल केला आहे. तसेच, उपरोक्त सर्व औषध पुरवठादारांविरूध्द औषधे व सौदर्य प्रसाधने कायदा, १९४० अंतर्गत न्यायालयीन कारवाई करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून महसूल वाढीसाठी नागरिकांवर "कचरा वापरकर्ता कर" आकारण्याच्या घेतलेल्या निर्णयाबाबत

**(२१) * ३२५० श्री.धीरज लिंगाडे, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून महसूल वाढीसाठी मुंबईतील नागरिकांवर "कचरा वापरकर्ता कर" आकारण्याचा निर्णय घेतला असून यासाठी निश्चित करण्यात आलेल्या कर प्रणालीनुसार मुंबईतील नागरिकांना दरवर्षी रुपये १००/- ते रुपये ७,५००/- अतिरिक्त कर भरावा लागणार असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाने स्वच्छता व आरोग्य उपविधी २०२५ चा मसुदा नव्याने तयार करून दिनांक ३ एप्रिल, २०२५ रोजी जनतेस सूचना व हरकतीसाठी सादर केला आहे तसेच नागरी संस्थांकडून दिनांक ३१ मे, २०२५ पर्यंत हरकती व सूचना पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबईची वाढती लोकसंख्या आणि घनकचऱ्याचे वाढते प्रमाण यामुळे मुंबईकरांकडून घनकचरा व्यवस्थापन वापरकर्ता शुल्क आकारण्यात येणार असून घराघरातून, कार्यालयातून, इमारतीतून कचरा संकलन करण्याबाबतचे हे शुल्क १००/- रुपयांपासून ७५००/- रुपयांपर्यंत असणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू शुल्कास सर्वसामान्य मुंबईकरांनी आणि लोकप्रतिनिधीनी विरोध दर्शविला असून सदरहू घनकचरा व्यवस्थापन वापरकर्ता शुल्कास मुंबईकरांचा असलेला विरोध लक्षात घेऊन सदरहू शुल्क रद्द करण्याबाबत शासनाने कोणता सकारात्मक निर्णय घेतला आहे तसेच सर्वसामान्यांच्या चाळी, बैठ्याचाळी, झोपडपट्ट्या यांना या करातून वगळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशतः खरे आहे.

केंद्र शासनाच्या घन कचरा व्यवस्थापन नियम, २०१६ नुसार बृहन्मुंबई महानगरपालिका, "घनकचरा (व्यवस्थापन आणि हाताळणी), २०२५" उपविधी (Bye Laws) तयार करण्याची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्तरावर सुरु आहे.

(२) व (३) हे खरे आहे.
(४) मालमत्ता करा मधील सुधारित देयकांमुळे नागरिकांवर पडणारा अतिरिक्त भार लक्षात घेऊन प्रस्तावित घन कचरा व्यवस्थापन शुल्काचा पुनर्विचार करण्याच्या अनुषंगाने घन कचरा व्यवस्थापन शुल्क स्थगित ठेवण्याचा निर्णय बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्तरावर घेण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कळसूबाई शिखर-हरिश्चंद्रगड 'रोप-वे' प्रकल्प पूर्ण करण्याबाबत

**(२२) * २२८७ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळसूबाई शिखर आणि हरिश्चंद्रगड (ता.अकोले, जि.अहिल्यानगर) येथे शासनाच्या पर्वतमाला योजनेंतर्गत 'रोप-वे' उभारण्यास तत्त्वतः मान्यता मिळाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर 'रोप-वे'च्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने १९ मार्च, २०२५ रोजी आदेश जारी केला असून या 'रोप-वे'साठी बांधकाम विभागाकडे स्वतःची जागा उपलब्ध नसल्यास इतर विभागांकडून जागा हस्तांतरित करून घेतली जाणार आहे आणि खाजगी मालकीची जागा असेल, तर ती ३० वर्षांच्या भाडेपट्टीवर उपलब्ध करुन देण्याची बाब विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,'रोप-वे'मुळे सदर भागात पर्यटकांच्या संख्येत वाढ होऊन पर्यटन व्यवसायास चालना मिळेल आणि स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रस्तुत 'रोप-वे' प्रकल्प तातडीने पूर्ण होण्यासाठी आवश्यक त्या निधीची तरतूद करुन पर्यटनस्थळ निर्माण होण्याच्या दृष्टीने तसेच स्थानिकांना रोजगार मिळणाच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) होय, दिनांक १९/०३/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये कळसूबाई शिखर व हरिश्चंद्रगड येथे रोप-वे उभारण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) बारी गावातील कळसुबाई शिखर रोपवे प्रकल्पांच्या विकासासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल अभ्यास करण्यासाठी सल्लागार सेवांसाठी एनएचएलएमएलने निविदा मागवल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात फळे पिकविण्यासाठी घातक रसायनांचा वापर करणाऱ्या फळ विक्रेत्यांवर कारवाई करण्याबाबत

**(२३) * ३२४३ श्री.वसंत खंडेलवाल, डॉ.परिणय फुके, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: अकोला, मुंबईसह अन्य जिल्हयांमधील फळविक्रेते आंबे व अन्य फळे पिकविण्यासाठी कॅल्शियम कार्बाइड, ॲसिटीलीन गॅस, आर्सेनिक आणि फॉस्फरस इ. घातक रसायनाचा वापर करुन फळांची विक्री करीत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ च्या शेवटच्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांच्या अहवालानुसार ह्या घातक रसायनाने पिकविलेल्या फळांचे सेवन मानवी आरोग्यास हानीकारक असून त्यामुळे चक्कर येणे, वारंवार तहान लागणे, चिडचिड होणे, अशक्तपणा गिळण्यास त्रास होणे, उलटया आणि त्वचेवर व्रण येणे, स्मृतीभंश, कावीळ, यकृत निकामी होणे व कॅन्सर यासारखे आजार होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अन्न व भेसळ प्रतिबंधक कायद्यानुसार कॅल्शियम कार्बाईड ह्यासारख्या घातक रसायनाच्या वापरावर बंदी असतानाही राज्यातील घातक रसायनांचा वापर करुन फळ विक्री करणाऱ्या विक्रेत्यांवर प्रशासनाकडून सक्त कारवाई करण्यात यावी अशी मागणी नागरिकांनी अन्न व औषध प्रशासनाचे सह आयुक्त यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने सदर प्रकरणाची दखल घेऊन मानवी आरोग्यास निर्माण होणारा धोका टाळण्याच्या दृष्टीने राज्यातील मुंबई, अकोलासह अन्य जिल्ह्यांतील घातक रसायनांचा वापर करुन फळे पिकविणाऱ्या फळविक्रेत्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ :** (१), (२), (३) व (४) अन्न सुरक्षा मानके (Prohibition & Restrictions on sale) Regulations २०११ मधील नियमन २/०३/५ नुसार कृत्रिमरित्या फळे पिकविण्यासाठी कार्बाईड गॅसचा वापर करण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे. तथापि, ऑगस्ट २०१६ मध्ये सदर नियमनामध्ये केलेल्या दुसऱ्या दुरुस्तीनुसार सदर नियमनाच्या परंतुकात कृत्रिमरित्या फळे पिकविण्यासाठी १०० पीपीएमपर्यंत इथिलिन गॅसचा वापरण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. त्यानुसार, अन्न व औषध प्रशासनामार्फत राज्यात फळे विक्रेते/व्यापारी यांचेकडून फळे कृत्रिमरीत्या पिकवण्यासाठी कार्बाइडचा वापर केला जावू नये याकरीता नियमितपणे तसेच विशेष मोहिमेअंतर्गत सदर आस्थापनांची तपासणी करून फळांचे नमुने विश्लेषणासाठी घेवून अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ व नियमन, २०११ मधीत तरतूदीनुसार कारवाई करण्यात येते.

अन्न व औषध प्रशासनाच्या अकोला कार्यालयामार्फत एकूण ०६ फळे विक्री करणाऱ्या आस्थापनांची तपासणी करण्यात आली असून सदर ठिकाणी फळे पिकविण्यासाठी कॅल्शियम कार्बाइड, ॲसिटीलीन गॅस, आर्सेनिक आणि फॉस्फरस इ. घातक रसायनाचा वापर करीत असल्याचे आढळून आले नाही.

तसेच, राज्यात बृहन्मुंबईसह इतर जिल्ह्यात माहे एप्रिल २०२५ ते मे २०२५ या कालावधीत आंबा या फळाचे ७३ व इतर फळांचे ०७ असे एकूण ८० कायदेशीर नमुने (Enforcement samples) विश्लेषणासाठी घेण्यात आले होते. त्यापैकी १८ नमुने प्रमाणित आढळून आले असून उर्वरित नमुन्यांचे विश्लेषण अहवालच्या अनुषंगाने कारवाई करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कॉटनग्रीन (मुंबई) येथील अभ्युदयनगरमधील म्हाडाच्या वसाहतींचा एकत्रित पुनर्विकास करणेबाबत

**(२४) * ३४८८ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती चित्रा वाघ, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कॉटनग्रीन (मुंबई) येथील अभ्युदयनगरमधील महाराष्ट्र गृहनिर्माण विकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) वसाहतींचा एकत्रित पुनर्विकास करण्याबाबत मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक ११ एप्रिल, २०२५ रोजीच्या बैठकीत किमान चटई क्षेत्र ६२० चौ.फुट निश्चित करुन नव्याने निविदा काढण्याचे निर्देश म्हाडास देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत म्हाडाकडून पीएमसीची (Project Management Consultant) नेमणूक व निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकल्पासाठी म्हाडामार्फत मे.देवधर असोसिएट्स यांची Project Management Consultant (PMC) म्हणून दिनांक १२/०७/२०२४ रोजी नेमणूक करण्यात आली आहे. सदर प्रकल्पासाठी म्हाडामार्फत दिनांक २९/०५/२०२५ रोजी संकेतस्थळावर निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उध्दभवत नाही.

-----------------

## पनवेल महानगरपालिकेंतर्गत तळोजा येथील भूखंडावर विकसित केलेल्या मैदानाची दुरवस्था झाल्याबाबत

**(२५) * २२७९ श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल महानगरपालिकेंतर्गत सिडकोने तळोजा सेक्टर-१० येथील भूखंडावर विकसित केलेल्या एकमेव खेळाच्या मैदानाची दुरवस्था झाली असून मुलांना खेळण्यासाठी हे मैदान धोकादायक असल्याची बाब माहे मे, २०२५ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मैदानात असलेली सर्व खेळणी मोडकळीस आलेली असून या मैदानात मोठ्या प्रमाणात कचरा साचलेला असून सिडकोने उभारलेले पथदिवे अनेक दिवसांपासून बंद असून वीजपेट्या व रोहित्र हे उघड्या अवस्थेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तळोजा परिसरात असलेल्या खेळाच्या मैदानाची दुरवस्था दूर करुन मैदान सुसज्ज बनविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) खरे नाही.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील तळोजा नोड मधील सेक्टर-१० येथील मैदानाची पूर्णपणे दुरावस्था झालेली नसून सद्य:स्थितीत खेळण्यासाठी उपलब्ध आहे.सदर खेळाचे मैदान धोकादायक असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(२) अंशत: खरे आहे.

जुन्या मोडकळीस आलेली खेळणी काढून टाकणेत आलेली आहेत.सदर मैदानातील कचरा नियमित उचलण्यात येतो.सिडकोने उभारलेले पथदिवे आवश्यकतेनुसार दुरुस्ती करण्यात येतात.वीजपेट्या व रोहित्र अंशत: उघड्या आहेत ही वस्तुस्थिती असून त्याबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांना आवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

(३) सदर मैदानाची अंशत: झालेली दुरावस्था दूर करण्यासाठी सविस्तर अंदाजपत्रक तयार करून पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करणेत येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील अनधिकृत इमारतींमुळे सदनिकाधारकांची फसवणूक होत असल्याबाबत

**(२६)** * **२४३६ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील करावे गावातील सेक्टर ३६ व इतर भागात मोठ्या प्रमाणात उभारण्यात आलेल्या अनधिकृत इमारतींवर महानगरपालिका प्रशासन व सिडकोकडून कारवाई करण्यात न आल्यामुळे भूमाफियांकडून शासनाच्या जमिनीवर अनधिकृत इमारत उभारुन सामान्य नागरिकांची फसवणूक करण्यात येत असल्याची बाब माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, करावे गावातील अशोक चौकातील जय मल्हार अपार्टमेंटमध्ये भूमाफियांनी अनधिकृत इमारत उभारुन त्यातील एकच घर अनेक जणांना विकून ग्राहकांची फसवणूक केल्याबाबतच्या तक्रारी कुलाबा व एनआरआय पोलीस स्थानकात करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नवी मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये उभारण्यात आलेल्या अनधिकृत इमारतींबाबत सन २०२४-२५ मध्ये सिडको व नवी मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडे किती तक्रारी प्राप्त झाल्या, त्याबाबत किती तक्रारीवरुन अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आली, किती तक्रारींवर कारवाई करणे बाकी आहे व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) असल्यास, अनधिकृत इमारती उभारणाऱ्या विकासक/ भूमाफिया यांचे महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचारी यांच्याशी आर्थिक संगनमत असल्यामुळे अनधिकृत बांधकामांकडे दुर्लक्ष करण्यात येत असल्याची तक्रार मा.मुख्यमंत्री यांच्याकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अनधिकृत बांधकाम जमिनदोस्त करुन विकासक/भूमाफियांवर गुन्हे दाखल करण्याबाबततसेच यास जबाबदार असलेल्या व कर्तव्यात कसूर करणाऱ्या महानगरपालिकेच्या व सिडकोच्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) अशा आशयाच्या तक्रारी शहर व औद्योगिक विकास महामंडळ (सिडको), नवी मुंबई महानगरपालिका व पोलीस प्रशासनास प्राप्त झाल्या, ही वस्तुस्थिती आहे.

(३) सन-२०२४-२५ मध्ये सिडको प्रशासनाकडे एकूण ७२६ तक्रारी प्राप्त झाल्या असून, त्यापैकी २९१ अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली आहेत. तर उर्वरित अनधिकृत बांधकामांना नोटीस बजाविण्यात आली असून, पुढील विहीत कार्यवाही सिडको महामंडळाकडून सुरू आहे.

- नवी मुंबई महानगरपालिकेकडे एकूण ३४९ तक्रारी प्राप्त झाल्या असून, त्यापैकी ९६ अनधिकृत बांधकामांवर निष्कासनाची कार्यवाही करण्यात आली आहे. तर उर्वरित अनधिकृत बांधकामांसंदर्भात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने पुढील विहीत कार्यवाही महानगरपालिका प्रशासनाकडून सुरू आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) सिडकोमार्फत करावे गावातील सेक्टर-३६ येथील अनधिकृत बांधकामांवर निष्कासनाची कार्यवाही करण्यात आली आहे. नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत ९२ इमारतीचे मालक तथा विकासकांवर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

- नागरिकांनी केलेल्या तक्रार अर्जावरुन एनआरआय सागरी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल असून, सदर प्रकरण मा.प्रथम वर्ग न्यायालय, बेलापूर येथे न्यायप्रविष्ट आहे.
- जय मल्हार अपार्टमेंट या अनधिकृत इमारतीमधील एकूण ३७ सदनिका धारकांना सिडकोमार्फत नोटिस बजाविण्यात आल्या असून, सदर सदनिका धारकांनी याअनुषंगाने मा.कनिष्ठ दिवाणी न्यायालयात दावे दाखल केले आहेत. बजाविण्यात आलेल्या सदर नोटिसांना मा.दिवाणी न्यायालय, बेलापूर या न्यायालयाकडून अंतरिम स्थगिती आदेश देण्यात आलेला आहे.
- मौजे करावे गावातील सेक्टर-३६ व इतर भागातील अनधिकृत बांधकामांबाबत सिडको प्रशासनाकडे प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने अनधिकृत बांधकामधारक/ विकासक/ भोगवटादार यांना रितसर नोटीसा बजाविण्यात आलेल्या आहेत. त्याविरूध्द मा.दिवाणी न्यायालयामध्ये दावे दाखल झाले असून, त्यामध्ये मा.न्यायालयाने अनधिकृत बांधकामे गिती/जैसे थे आदेश पारीत केलेले आहेत.
- सदर दाव्याच्या संदर्भात प्रतिज्ञापत्र दाखल करून/लेखी म्हणणे मांडून प्रकरणे निर्णयीत करण्याची विनंती सिडकोमार्फत मा.न्यायालयास करण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील गिरणी कामगारांना आणि त्यांच्या वारसांना गिरण्यांच्या जागेवर हक्काची घरे देण्याबाबत

**(२७) * ३७५३ श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.संजय केणेकर, श्री.विक्रम काळे, श्री.संजय खोडके, श्रीमती चित्रा वाघ : तारांकित प्रश्न क्रमांक ८० ला दिनांक ४ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गिरणी कामगारांना लवकरात लवकर मुंबईमध्ये हक्काचे घर मिळाले पाहिजे या मागणीसाठी राष्ट्रीय मिल मजदूर संघाच्या नेतृत्वाखाली परळ येथे मेळावा आयोजित करण्यात आल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईतील गिरणी कामगारांना आणि त्यांच्या वारसांना गिरण्यांच्या जागेवर घरे देण्याबाबत शासनाने निर्णय घेतला असून एकूण किती गिरणी कामगार वा त्यांचे वारस घरे मिळण्यासाठी पात्र आहेत, त्यानुसार आतापर्यंत किती गिरणी कामगारांना वा त्यांच्या वारसांना घरे देण्यात आली आहेत, ती केव्हा देण्यात आली, उर्वरित किती गिरणी कामगार/वारसदार यांना घरे देणे बाकी आहेत,
(३) असल्यास, मुंबईतील गिरणी कामागारांना व त्यांच्या वारसांना गिरण्यांच्या जागेवर विशिष्ट कालावधीत घरे देण्याबाबत शासनाने कालबध्द कार्यक्रम आखला आहे काय, तसेच मुंबईतील बंद/आजारी गिरण्यांमधील गिरणी कामगारांसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास (MMR) क्षेत्रामध्ये घरकुले उपलब्ध करुन देण्यासाठी दिनांक १५ मार्च,२०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार केलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,
(४) असल्यास, म्हाडा व कामगार विभागाने घेतलेल्या विशेष मोहिमेंतर्गत प्राप्त झालेल्या अर्जांपैकी आत्तापर्यंत प्रलंबित असलेल्या अर्जांवर गिरणी कामगार म्हणून पात्र करुन घेण्याच्या नोंदणी प्रक्रियेचे स्वरुप व सद्य:स्थिती काय आहे,
(५) असल्यास, मुंबईतील गिरणी कामगारांना आणि त्यांच्या वारसांना हक्काची घरे तात्काळ देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) राष्ट्रीय मिल मजदूर संघाच्या नेतृत्वाखाली परळ येथे मेळावा आयोजित केल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आलेली नाही.
(२) गिरणी कामगारांना आतापर्यंत १५,८७० घरकुलांचे वाटप खालीलप्रमाणे करण्यात आले आहे.

| वर्ष | एकूण घरकुले |
|---|---|
| २०१२ | ६९२५ |
| २०१६ | २६३४ |
| २०१६ | २४१७ |
| २०२० | ३८९४ |
| एकूण | १५,८७० |

म्हाडा व कामगार विभागाने घेतलेल्या विशेष मोहिमेंतर्गत आत्तापर्यंत ९८,६१९ गिरणी कामगार पात्र झाले आहेत.
(३) मुंबईतील बंद/आजारी गिरण्यांमधील गिरणी कामगारांसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास (MMR) क्षेत्रामध्ये घरकुले उपलब्ध करुन देण्यासाठी दिनांक १५/०३/२०२४ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार शक्तीप्रदत्त समितीच्या मान्यतेने EoI प्रसिध्द करून दोन विकासकांची निवड करण्यात आली आहे.

प्रस्तुत प्रकरणी, गिरणी कामगारांकडून दिनांक १६/०६/२०२५ पासून Online फॉर्म भरण्यात येत असून आतापर्यंत, एकूण १,०८२ अर्जदारांनी ऑनलाईन अर्ज सादर केले आहेत

(४) म्हाडा व कामगार विभागाने घेतलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत सुधारित केल्याप्रमाणे दिनांक १६/०६/२०२५ पर्यंत १,०७,३८६ इतके अर्ज प्राप्त झाले असून, त्यापैकी ९८,६१९ इतके गिरणी कामगार पात्र झाले आहेत.

(५) दिनांक १५/०३/२०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार गिरणी कामगारांना घरे देण्याची कार्यवाही सुरू आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरीत महाराष्ट्र या तीन वैधानिक विकास मंडळांच्या मुदतवाढीबाबत

**(२८) * ३९३२ श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरीत महाराष्ट्र या तीन वैधानिक विकास मंडळांची मुदत संपून पाच वर्ष पूर्ण झाली असून दिनांक ३० एप्रिल, २०२० रोजी मुदत वाढविण्यासाठी राज्य शासनाने केंद्रशासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावामध्ये वैधानिक शब्द गहाळ/ वगळण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भारतीय राज्यघटनेतील ३७१ (२) या अनुच्छेदानुसार वैधानिक शब्द गहाळ केल्यास या मंडळाचे सर्व अधिकार संपुष्टात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र या तीन वैधानिक विकास मंडळाची मुदत संपून पाच वर्षे होऊनही सदरहु मंडळास मुदतवाढ देण्यात आली नसल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले असून शासनाने उक्त विकास मंडळाला मुदतवाढ देण्याची विनंती केंद्र शासनाकडे करुन अडीच वर्षाचा कालावधी उलटूनही अद्यापही मुदतवाढ देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र या तीन वैधानिक विकास मंडळांना त्वरीत मुदतवाढ मिळण्यासाठी केंद्र शासनाकडे आवश्यक पाठपुरावा करण्यासह शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उदभवत नाही.

(३) होय, हे खरे आहे.

(४) विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र या तीनही विकास मंडळाची मुदत दिनांक ३० एप्रिल, २०२० रोजी संपुष्टात आली आहे. त्यानुषंगाने उपरोक्त तीन्ही महामंडळाना मुदत वाढ दिल्यानंतर सदर विकास मंडळाना वैधानिक विकास मंडळे असे संबोधण्यात यावे या मत्रिमंडळ बैठकीमधील निर्णयानुसार, सदर मंडळांचे पुनर्गठन करण्याबाबत दिनांक २८/१०/२०२२ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनास विनंती करण्यात

आली आहे. त्यानंतर याप्रकरणी वेळोवेळी पत्रव्यवहार करून पाठपुरावा करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## परळ येथील राजे एडवर्ड स्मारक रुग्णालयातील (के.ई.एम.) कामगारांचे वेतन प्रलंबित असल्याबाबत

**(२९) * २५७३ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारितील परळ, मुंबई येथील राजे एडवर्ड स्मारक रुग्णालय (के.ई.एम.), येथील रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगारांना गत ४ ते ५ महिन्यांचे मासिक वेतन मिळाले नसल्याने त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ च्या तिसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कामगारांचा दिवाळीचा बोनसही अद्याप प्रलंबित ठेवण्यात आल्याने कर्मचारी वर्गात असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असून सदर कामगारांचे प्रलंबित वेतन व दिवाळी बोनस त्यांना तातडीने अदा करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

राजे एडवर्ड स्मारक रुग्णालय, परळ येथे रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगारांना माहे एप्रिल, २०२५ पर्यंतचे मानधन अदा करण्यात आले आहे.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयात रोजंदारी तत्त्वावर कार्यरत कामगारांना दिवाळी बोनस देण्याबाबतचे बृहन्मुंबई महानगरपालिकेचे कोणतेही धोरण नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मालाड (प.) येथील शासकीय जमिनीवर अतिक्रमण करुन अवैधरित्या " पे ॲण्ड पार्किंगची" व्यवस्था करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(३०) * २३१० डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने, श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालाड (मुंबई) पश्चिमेकडील अक्सा बीचजवळच्या शासकीय जमिनीवर अतिक्रमण करुन अवैधरित्या “पे ॲण्ड पार्किंग” ची व्यवस्था करण्यात आली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सीटी सर्व्हे नं ९८ या शासकीय जमिनीवर अतिक्रमण करुन कणसारी माता आदिवासी सामजिक विकास संस्थेने अवैधरित्या पे ॲण्ड पार्किंगची सुविधा सुरु करुन बृहन्मुंबई महानगरपालिकेची परवानगी न घेता वाहनधारकांकडून पैसे घेतले जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी दोषी आढळून आलेल्या संबंधितांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळामार्फत जिल्हा विकास निधी अंतर्गत मौजे अक्सा येथील न.भू.क्र. ९८ या जागेवर वाहनतळ विकसित करुन प्रचलित पध्दतीने देखभाल व दुरुस्तीकरीता कणसारी माता आदिवासी सामाजिक विकास संस्था या स्वयंसेवी संस्थेस विना वाणिज्यिक वापराच्या अटीवर हस्तांतरीत करण्यात आले होते. तथापि, या वाहनतळावर संस्थेमार्फत शुल्क आकारणी करण्यात येत असल्याचे निदर्शनास आल्याने, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाने सदरहू संस्थेसोबतचा करारनामा रद्द करुन सदर जागा ताब्यात घेतली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील बनावट दूध व पनीरच्या विक्रीवर बंदी घालण्याबाबत

**(३१) * ३१५८ श्री.श्रीकांत भारतीय, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत, श्री.वसंत खंडेलवाल, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ : तारांकित प्रश्न क्रमांक २१७८ ला दिनांक २० मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात उन्हाळयात दूध उत्पादनात घट होत असताना दुधाच्या मागणीत होणारी वाढ पूर्ण करण्याकरीता दूधात भेसळ व हानिकारक रसायने, डिटर्जंट्स आणि कृत्रिम दूध वापरून पनीर तयार केले जात असून दूध व पनीरच्या भेसळीचा आलेख गत काही वर्षात वाढल्याने राज्याच्या अन्न व औषध प्रशासन विभागाने एकाच दिवशी एक हजाराहून अधिक दुधाचे नमूने तपासणीकरीता गोळा केल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बाजारात विक्रीकरीता असलेल्या एकूण पनीरपैकी केवळ २५ ते ३० टक्के इतके पनीर हे शुध्द दूधापासून तयार केले जात असून उर्वरीत ७० ते ७५ टक्के पनीर हे भेसळ असलेले म्हणजेच चीज ॲनालॉगपासून बनविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आतापर्यंत केलेल्या तपासणीमध्ये किती नमूने हे धोकादायक व भेसळीचे आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषी दूध उत्पादक व दूध विक्री करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली तसेच अन्न व औषध प्रशासन विभागाकडे आवश्यक कर्मचारी वर्ग नसल्यास सदरहू काम हे दुग्धविकास विभागाकडे हस्तांतरीत करण्याबाबत तसेच दूध भेसळ करणाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांचेविरूध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे,
(४) असल्यास, बनावट पनीर हे मानवी आरोग्यास हानीकारक असल्याने सदरहू बनावट पनीरच्या विक्रीवर बंदी घालण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दूध भेसळ व बनावट पनीर विक्री करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली तसेच दूध भेसळ व बाजारातील बनावट पनीरची तपासणी करण्याकरीता राज्यात प्रयोगशाळा उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ :** (१) उन्हाळ्यात दूध उत्पादनात घट होत असताना दुधाच्या मागणीत होणारी वाढ पूर्ण करण्याकरीता दुधात भेसळ व हानिकारक रसायने, डिटर्जंट्स वापरून दुध तयार केले जाते हे खरे नाही. तसेच, कृत्रिम दूध वापरून पनीर तयार केले जाते, हे ही खरे नाही. तथापि, दूध व दुग्धजन्य पदार्थामधील भेसळ रोखण्यासाठी दिनांक १५/०१/२०२५ रोजी एकाच दिवशी राज्यात विविध ठिकाणावरून एकूण १०९४ दुधाचे सर्वेक्षण नमुने विश्लेषणासाठी अन्न व औषध प्रशासनाने घेतले आहेत.

(२), (३), (४) व (५) अन्न व औषध प्रशासनाने राज्यात ०१ एप्रिल, २०२४ ते ३१ मार्च, २०२५ या कालावधीत दूध या अन्न पदार्थाचे एकूण १५३७ नमुने विश्लेषणाकरीता घेण्यात आले. त्यापैकी ९८० नमुने प्रमाणित, १३५ नमुने कमी दर्जाचे, १०६ असुरक्षित घोषित झाले असून ३१६ नमुन्यांचे विश्लेषण अहवाल प्रलंबित आहेत.

तसेच, अन्न व औषध प्रशासनाने राज्यात १ एप्रिल, २०२४ ते ३१ मार्च, २०२५ या कालावधीत पनीरचे एकूण ६७३ नमुने विश्लेषणाकरीता घेण्यात आलेले असून त्यापैकी ३२६ नमुने प्रमाणित, १०० नमुने कमी दर्जाचे व ८४ नमुने असुरक्षित घोषित झाले असून १६३ नमुन्यांचे विश्लेषण अहवाल प्रलंबित आहेत.

कमी दर्जाच्या व असुरक्षित दूध व पनीर अन्न नमुन्यांच्या अनुषंगाने अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ व त्याखालील नियम व नियमनामधील तरतूदीनुसार नियमानुसार कारवाई करण्यात येत आहे.

अन्न व औषध प्रशासनात दिनांक ०७/०६/२०२५ रोजी एकूण १८९ नवीन अन्न सुरक्षा अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे सदरहू काम हे दूग्धविकास विभागाकडे हस्तांतरीत करण्याची आवश्यकता वाटत नाही.

सद्य:स्थितीत अन्न व औषध प्रशासनाच्या तीन प्रयोगशाळा मुंबई, छत्रपती संभाजीनगर व नागपूर येथे कार्यरत असून पुणे व नाशिक येथे प्रयोगशाळेचे बांधकाम सुरू आहे. अमरावती व कोकण विभागासाठी नवीन प्रयोगशाळा उभारण्याचे प्रस्तावित आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मोकाट श्वानांचे वाढते हल्ले रोखण्याकरीता उपाययोजना करण्याबाबत

**(३२) * ३३५४ श्री.कृपाल तुमाने, श्री.हेमंत पाटील, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.संदीप जोशी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विविध शहरांमध्ये मोकाट श्वानांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली असून त्यांचेकडून नागरिकांवर विशेषतः लहान बालकांवर हल्ला होण्याच्या घटनेत मोठ्या प्रमाणात वाढ झाली असल्याची बाब माहे एप्रिल – मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील काही ठिकाणी विशेषतः नागपूर शहर व परिसरातील मोकाट श्वानांमुळे नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून त्यांनी स्थानिक प्रशासनाकडे याबाबत तक्रारी देखील केल्या आहेत तसेच अशा घटनातील जखमींनी मावेजा देखील मागितला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०२३-२४ मध्ये सुमारे ५ लाख घटना निदर्शनास आल्या असून सन २०२४-२५ मध्ये ह्या घटनांमध्ये वाढ होवून ७ लाखांच्या वर घटना घडल्या आहेत तसेच या गंभीर घटनांची दखल घेवून शासनाने स्वतंत्र पशू जन्म नियंत्रणासाठी कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, मोकाट श्वानांचे निर्बीजीकरण करणे तथा त्यांच्यावर नियंत्रण मिळविणेकरिता शासन नियमित खर्च करीत असून देखील अशा घटनांचे प्रमाण वाढत असल्याने याबाबत चौकशी करणेकरीता शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये श्वान हल्ल्याच्या घटना सन २०२३-२०२४ मध्ये ३,४४,२८६ तर सन २०२४-२०२५ मध्ये ३,२४,८१५ घडल्या असून मागील वर्षापेक्षा नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये करण्यात येणाऱ्या निर्बिजीकरण व लसीकरणामुळे या घटनांमध्ये घट झाल्याचे निदर्शनास येत आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

नागपूर महानगरपालिकेमध्ये श्वानांच्या हल्ल्यासंदर्भात तक्रारी प्राप्त आहेत. परंतु जखमींनी मावेजा देण्याबाबत मागणी केली नसल्याचे नागपूर महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये श्वानांच्या हल्ल्यांच्या घटना सन २०२३ - २०२४ मध्ये ३,४४,२८६ तर सन २०२४-२०२५ मध्ये ३,२४,८१५ घडल्याचे निदर्शनास येत आहे

कमिशन फॉर प्रोटेक्शन ऑफ चाइल्ड राइट्स (CPCR) कायदा, २००५ व प्राणी जन्म नियंत्रण (Animal Birth Control) नियम, २०२३ राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अंमलबजावणी करण्यास्तव दिनांक २० मार्च, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये लागू करण्यात आला आहे.

(४) १) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये प्राणी जन्म नियंत्रण नियम, २०२३ आणि अँटी रेबीज कार्यक्रम संयुक्तपणे राबविला जातो.

२) मोकाट श्वानांना स्थलांतरित न करता निर्बिजीकरण करणे आणि रेबीज प्रतिबंधात्मक लसीकरण करण्यात येते.

३) पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सल्ल्यानुसार, कोणत्याही संसर्गजन्य रोगाची लक्षणे असलेल्या कुत्र्याला आयसोलेशनमध्ये ठेवले जाते.

४) रेबीज संशयित श्वान दंशाच्या तक्रारी घेण्याकरीता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामार्फत प्राणी तक्रार कक्ष स्थापन करण्यात आलेले आहेत. तसेच प्राप्त मोकाट श्वानांच्या हल्ल्याची माहिती सरकारी वैद्यकीय रुग्णालयाला दिली जाते. तसेच रेबीज संशयित श्वानास त्यांच्या नैसर्गिक मृत्यूपर्यंत वेगळे ठेवण्यात येते. रेबीजमुळे मृत्यूमुखी पडलेल्या श्वानांच्या मृतदेहांची विल्हेवाट पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेल्या सुचनेनुसार करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून मोशी विभागात दूषित पाणीपुरवठा होत असल्याबाबत

**(३३) * २९५७ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून मोशी विभागातील गायकवाड वस्ती, तळेकर नगर, बोराटे वस्ती शिवरस्त्यावरील सोसायटीमध्ये गेल्या अनेक दिवसांपासून दूषित पाणीपुरवठा होत असून पाण्याला दुर्गंधी येत असल्यामुळे नागरिकांना आरोग्याच्या समस्यांना सामोरे जावे लागत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत नागरिकांनी तक्रार करूनही सदर महानगरपालिकेकडून अद्याप शुध्द पाणीपुरवठा करण्यात येत नसल्याने महानगरपालिकेकडून होणाऱ्या दूषित पाणीपुरवठ्यामुळे मोशी वासियांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशतः खरे आहे.

मौजे निघोजे येथील इंद्रायणी नदीवरील को.प. बंधाऱ्याच्या उर्ध्वबाजूस उदंचनगृह बांधण्यात येऊन तेथून पाणी उचलून ते चिखली जलशुद्धीकरण केंद्रात शुध्द केले जाते. सदरचे शुध्द केलेले पाणी मोशी विभागातील गायकवाड वस्ती, तळेकर नगर, बोराटे वस्ती, शिवरस्त्यावरील सोसायटी येथे पुरविण्यात येते. सदर भागात पिण्याच्या पाण्याच्या दूषित व दुर्गंधीयुक्त पुरवठ्याबाबत तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.

(२) व (३) निघोजे जल उपसा केंद्र येथे एरिएटर यंत्राची स्थापना करण्यात आलेली आहे. ज्यामुळे पाण्यात ऑक्सिजनचे प्रमाण वाढवून जल गुणवत्तेत सुधारणा साधली जात आहे.

जलस्त्रोतात वाढलेल्या जलपर्णीचा तातडीने नाश करण्यासाठी विशेष मोहिम आखण्यात आलेली असून सद्य:स्थितीत जलपर्णी काढण्यात आली आहे.

पाटबंधारे विभागातील संबंधित अधिकाऱ्यांना निघोजे (को.प.) बंधाऱ्याच्या दुरुस्ती व देखभालीसाठी आवश्यक कार्यवाही तात्काळ करण्यात यावी अशा सूचना दिलेल्या आहेत.

भविष्यात मोशी विभागातील गायकवाड वस्ती, तळेकर नगर, बोराटे वस्ती, शिवरस्त्यावरील सोसायटी परिसरातील पाणीपुरवठा स्वच्छ, निरोगी व मुबलक ठेवण्यासाठी नियमित जल गुणवत्तेच्या चाचण्या व देखरेख केली जात आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## समृध्दी महामार्गाचा इगतपूरी ते आमणे दरम्यानचा अंतिम टप्पा प्रवासी वाहतुकीसाठी खुला करण्याबाबत

**(३४) * २६९६ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातून जाणाऱ्या देशातील सर्वात लांब अशा हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृध्दी महामार्गाचा इगतपूरी ते ठाणे जिल्ह्यातील आमणेपर्यंतचा अंतिम टप्पा प्रवासी वाहतूकीसाठी अद्याप खुला करण्यात आला नसल्याची बाब माहे मे, २०२५ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तिसऱ्या टप्प्यामुळे घोटी- सिन्नर मार्गावर वाहनधारकांना प्रवास करण्याकरीता कमी वेळ लागणार असून इगतपुरीपासून अवघ्या दोन किलोमीटर अंतरावर समृध्दी महामार्गावर जाता येणार असूनही या महामार्गाचा अंतिम टप्पा प्रवासी वाहतुकीसाठी खुला करण्याचे उद्घाटन वारंवार पुढे ढकलले जात असल्याने प्रवासी नाराजी व्यक्त करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने निर्णय घेवून सदरील समृध्दी महामार्ग प्रवाशांसाठी खुला करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) दिनांक ०५/०६/२०२५ रोजी इगतपूरी ते आमणे हा समृध्दी महामार्गाचा अंतिम टप्पा वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारितील क्षेत्रांमधील जलजमाव कमी करण्यासाठी पंपिंग व्यवस्था भाड्याने पुरविण्याच्या कामांच्या निविदांमध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(३५) * २३८२ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्गावरील हिंदमाता आणि मडके बुआ चौक येथे जलजमाव कमी करण्यासाठी पंपिंग व्यवस्था भाड्याने पुरविण्याच्या कामाच्या निविदांमध्ये एसडब्ल्यूडी विभागाने एसबीडीच्या सर्व अटींचे उल्लंघन करून केलेल्या अनियमिततेबाबत चौकशी करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी आयुक्त, तसेच उपायुक्त (पायाभूत सुविधा), बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे दिनांक ४ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुसळधार पावसात पाण्याचा निचरा जलदगतीने व्हावा याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने हिंदमाता व मिलन सब वेच्या ठिकाणी अतिरिक्त पाण्याच्या टाक्यांची व्यवस्था केली आहे काय, तसेच गांधी मार्केट परिसरातील पाण्याच्या निचऱ्यासाठी मिनी पंपींग स्टेशन तयार केले असूनही याच परिसरात पाणी तुंबण्याच्या प्रकारास प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, शासनाने पंपिंग व्यवस्था भाड्याने पुरविण्याच्या कामांच्या निविदा प्रकरणातील दोषी अधिकारी/कर्मचारी तसेच कंत्राटदार यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मुसळधार पावसात पाण्याचा निचरा जलदगतीने व्हावा याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने हिंदमाता आणि मडके बुआ चौक येथील सेंट झेव्हीयर मैदानात २८००० घन मी. (२ कोटी ८० लाख लिटर) आणि प्रमोद महाजन कला पार्क येथे ३६००० घन मी. (३ कोटी ६० लाख लिटर) क्षमतेच्या भूमिगत टाक्या बांधण्यात आल्या असून एकूण ४५००० घन मी. प्रति तास क्षमतेच्या उदंचन संचाची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच, मिलन सबवे येथे ३०००० घन मी. (३ कोटी लिटर) येवढया क्षमतेची टाकी बांधून उदंचन संचाची व्यवस्था करण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे गांधी मार्केट या ठिकाणी एकूण १८००० घन मी. प्रति तास क्षमतेची मिनी पंपिंग स्टेशनची उभारणी करण्यात आली आहे.

(३) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्गावरील हिंदमाता आणि मडके बुआ चौक परिसरातील साचलेल्या पावसाचे पाणी जलद गतीने निचरा होण्यासाठी तांत्रिक दृष्टया कौशल्यपूर्ण निपुण असलेले कंत्राटदाराची निवड करण्यासाठी आणि निविदा पारदर्शक व स्पर्धात्मक व्हावी यासाठी आवश्यक अटी व शर्ती नमूद करुन नामांकित वृत्तपत्रांमध्ये जाहिरात देऊन तसेच महाटेंडर या पोर्टलवर प्रकाशित करुन निविदा मागविण्यात आल्या. सदर कामाकरीता तीन प्रतिसादात्मक निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेस महानगरपालिकेच्या प्रशासक स्थायी समितीच्या मंजूरीने कंत्राटदारास कार्यादेश देण्यात आला आहे. पावसाळा सुरु झाल्याने कंत्राटदारामार्फत हिंदमाता या परिसरात पंप यशस्वीरित्या बसविण्यात आले आहेत.

सदर निविदा प्रक्रिया ही महानगरपालिकेच्या नियमांच्या अधीन राहून पारदर्शक आणि स्पर्धात्मक रित्या पार पाडण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागात बोगस दिव्यांग शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची नियुक्ती केल्याबाबत

**(३६) * २५७६ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागात बोगस दिव्यांग शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी नियुक्ती प्रकरणाची चौकशी करण्याबाबतच्या मागणीनंतर शिक्षणाधिकाऱ्यांनी दिव्यांग कर्मचाऱ्यांची पुन: पडताळणी करण्याचे आदेश माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान दिले असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागामध्ये दिव्यांग कर्मचारी शिक्षकांची संख्या ११४ इतकी असून त्यापैकी १०२ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नियमानुसार पुन: पडताळणी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कर्मचाऱ्यांची पुन: पडताळणी कधीपर्यंत करणे अपेक्षित आहे व नियमानुसार ४०% पेक्षा कमी दिव्यांग असल्याचे सिध्द झाल्यास त्या कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

बृहन्मंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाधील १०४ दिव्यांग कर्मचारी व शिक्षकांपैकी ३० शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पुन:पडताळणी झालेली आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून पुन:पडताळणीकरीता विभागस्तरावर सूचना/ निर्देश देण्यात आले आहे. ४०% पेक्षा कमी दिव्यांग असल्याचे सिध्द झाल्यास बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून नाले सफाईची कामे निकृष्ट दर्जाची होत असल्याबाबत

**(३७) * २७७० श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसारख्या जागतिक दर्जाच्या शहरात दरवर्षी पावसाळ्यात अनेक भाग जलमय होऊन सांडपाणी रस्त्यांवर जमा होत असून बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून दरवर्षी नाल्यांची सफाई करणे आवश्यक असताना प्रत्यक्षात फक्त ४०% नाल्यांचीच सफाई झाल्यामुळे आरोग्याच्या समस्या निर्माण होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पावसाळा अवघ्या काही दिवसावर आला असता मुंबईतील नालेसफाईची कामे संथगतीने सुरु असल्याचे पालकमंत्री महोदयांनी केलेल्या पाहणी दौऱ्यात निदर्शनास आले असून नुकत्याच झालेल्या पूर्व मोसमी पावसाने मुंबई जलमय झाल्यामुळे पालकमंत्री महोदयांनी नालेसफाईच्या कामांबाबत प्रशासनाप्रती नाराजी व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गत काही वर्षात नालेसफाईसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेला मोठ्या प्रमाणात निधी प्राप्त होवूनही निकृष्ट दर्जाची कामे केली जातात तसेच काही भागांमध्ये अजूनही तुंबलेली गटारे आणि दुर्गंधीमुळे नागरिक त्रस्त झाले असून त्यांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबई शहरातील मोठ्या गटारांवर/नाल्यांवर होणारे अतिक्रमण निष्कासित करण्याच्या दृष्टीने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येत असलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे, तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रांतर्गत येणाऱ्या मुंबईतील उघडे नाले / गटारे बंद करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नालेसफाई कामांमध्ये अधिकारी आणि ठेकेदार यांच्या संगनमताने मोठ्या प्रमाणात अनियमितता होत असल्याबाबतची माहिती माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आली असून प्रत्यक्षात नाल्यातील गाळ न काढता बांधकामाच्या साईटवरील माती आणि राडारोडा नाल्यातील गाळ म्हणून नोंद करून ठेकेदार कोट्यवधी रक्कमेची देयके मंजूर करून घेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, नालेसफाईतील गैरव्यवहार थांबविण्यासाठी सुरु केलेली ॲप सिस्टमही ठेकेदारच चालवित असल्याची बाब निदर्शनास आली असून संबंधित ठेकेदारावर दंडात्मक कारवाई आणि बृहनमुंबई

महानगरपालिकेच्या संबंधित दोषी अधिकारी यांना निलंबित करण्याच्या दृष्टीने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
दिनांक ०८/०५/२०२५ व दिनांक ०९/०५/२०२५ रोजी नालेसफाईच्या कामावर केलेल्या पाहणी दौऱ्यादरम्यान मा.पालकमंत्री महोदयांनी असे मत व्यक्त केले.
(३) हे खरे नाही.
(४) मा.राष्ट्रीय हरित लवाद यांनी याचिका क्र. २५४/२०१८ मध्ये दिनांक २३/०७/२०१८ रोजी पर्जन्य जल वाहिन्या बंदिस्त न करता त्यातील गाळ काढून स्वच्छ ठेवण्याचे आदेश पारित केले आहे. त्याप्रमाणे महानगरपालिका कार्यवाही करीत आहे.
(५) व (६) हे अंशतः खरे आहे.
सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दक्षता विभागामार्फत चौकशी सुरू आहे.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## संगमनेर (जि.अहिल्यानगर) शहरातील कचऱ्याचे व्यवस्थापन व विल्हेवाट करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(३८)** * **२२९० श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संगमनेर (जि.अहिल्यानगर) शहरातील कचरा डेपोतील कचऱ्यामुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असून वारंवार आगी लागत असल्यामुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कचरा डेपोतील आगीमुळे निर्माण होणाऱ्या धुराने परिसरात राहणाऱ्या नागरिकांना श्वसनासंबंधी त्रास होत असून यासाठी स्थानिक पातळीवर आंदोलने केली जात आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संगमनेर नगरपरिषदेकडून कचरा डेपोच्या व्यवस्थापनासाठी योग्य उपाययोजना केल्या नसल्यामुळे ही समस्या अधिक तीव्र होत असून डेपोतील कचरा अन्य ठिकाणी टाकण्याचा प्रयत्न केला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, संगमनेर शहरातील कचऱ्याचे योग्य पध्दतीने व्यवस्थापन व विल्हेवाट करण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या तसेच कचरा डेपो व्यवस्थापनातील अनियमिततेची चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशतः खरे आहे.
माहे एप्रिल, २०२५ मध्ये संगमनेर कचरा डेपोला आग लागली होती.
कचरा डेपोतील आगीमुळे निर्माण होणाऱ्या धुराने परिसरात राहणाऱ्या नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला असल्याबाबतच्या तक्रारी नगरपरिषदेस प्राप्त झालेल्या नाहीत.

(२) हे खरे नाही.
(३) व (४) हे खरे नाही.

घनकचरा व्यवस्थापन अधिनियम, २०१६ नुसार कचरा संलकन करणे, वाहतूक करणे, कचऱ्याचे वर्गीकरण करणे, कचऱ्यावर प्रक्रिया, विल्हेवाट लावणे व इतर आवश्यक उपाययोजना नगरपरिषदेमार्फत केल्या जातात. घनकचरा प्रक्रिया प्रकल्प येथे कचऱ्यावर बायोकल्चर फवारणी करून विन्ड्रो कंपोस्टिंग व पीट कंपोस्टिंग द्वारे प्रक्रिया करण्यात येते. हॉटेल व घरगुती किचनमधील ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करून बायोगॅस प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे.

वर्गीकृत सुका कचरा संकलित करण्यात येऊन त्यासाठी Material Recovery Facility (MRF) सेंटर उपलब्ध असून बेलिंग मशीन द्वारे बेलिंग बनविण्यात येते. घनकचरा प्रक्रिया प्रकल्प येथे येणाऱ्या संपूर्ण कचऱ्यावर १००% शास्त्रोक्त पध्दतीने दैनंदिन बायोमायनिंग प्रक्रिया करण्यात येते. संगमनेर खुर्द घनकचरा प्रक्रिया प्रकल्प डेपोतील कचरा अन्य ठिकाणी टाकण्याचा प्रयत्न करण्यात येत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कुर्ला (पूर्व) येथे नेहरु नगर पोलीस वसाहतीचा पुनर्विकास करण्याबाबत

**(३९) * ३४९१ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, अॅड.निरंजन डावखरे, श्रीमती चित्रा वाघ, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुर्ला (पूर्व) येथील नेहरु नगर पोलीस वसाहतीतील १९ इमारती मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाकडून बांधण्यात आल्या असून ज्याप्रमाणे बांधकाम खर्चाची रक्कम आकारुन बीडीडी चाळीतील पोलीस कर्मचाऱ्यांना घरे उपलब्ध करुन देण्यात आली आहेत, त्याच धर्तीवर नेहरु नगर, कुर्ला, मुंबई येथील पोलीस वसाहतींचा पुनर्विकास करण्याची विनंती लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ४ एप्रिल, २०२५ रोजीच्या पत्रान्वये शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कुर्ला (पूर्व) येथील नेहरु नगर पोलीस निवास वसाहतीची अत्यंत दुरवस्था झाली असून इमारतींचा पुनर्विकास करण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकल्प राबविण्याच्या अनुषंगाने उपलब्ध असलेल्या विविध विकास पर्यायांचा (Development Models) तुलनात्मक अभ्यास करून म्हाडास्तरावर प्रकल्प व्यवहार्यता अहवाल तयार करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उध्दभवत नाही.

-----------------

## पनवेल महानगरपालिका हद्दीतील मोकळ्या भूखंडांवर अतिक्रमण झाल्याबाबत

**(४०) * २२८२ श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल महानगरपालिका हद्दीत असलेल्या अनेक मोकळ्या भूखंडावर अतिक्रमण करून बेकायदेशीर व्यवसाय केले जात असून कामोठे (ता.पनवेल, जि.रायगड) येथील एका तलावात अनधिकृतरित्या डेब्रिजचा भराव टाकून अतिक्रमण करून बेकायदा पध्दतीने भंगार व्यवसाय, गॅरेज व फर्निचरची दुकाने सुरू असल्याची बाब माहे मे, २०२५ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पनवेल महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणात मोकळ्या भूखंडावर होणारे अतिक्रमण थांबविण्यासाठी तसेच अतिक्रमण होईपर्यंत संबंधित अधिकाऱ्यांनी अतिक्रमण करणाऱ्याविरुध्द कारवाई न करता त्यावर कोणताही प्रतिबंध आणला नाही अशा अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

कामोठे नोडमध्ये ना-विकास क्षेत्रातील अनधिकृत तात्पुरत्या स्वरुपाची अतिक्रमणे जसे गॅरेज, फर्निचर दुकाने, हातगाड्या, टायर पंक्चर दुकाने इ. सिडकोमार्फत निष्कासित करण्यात आली आहेत. तसेच सदर क्षेत्रामध्ये डेब्रीज न टाकण्याबाबत सूचनाफलक लावण्यात आले आहेत. सद्य:स्थितीत, कामोठे नोड येथील ना-विकास क्षेत्र अतिक्रमणमुक्त ठेवण्यासाठी संरक्षित कुंपण उभारण्याचे सिडको स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(२) पनवेल महानगरपालिका हद्दीतील सिडको अधिसूचित क्षेत्रात माहे जानेवारी-२०२४ ते २४ जून २०२५ या कालावधीत एकूण १५३४ अनधिकृत बांधकामे (आर.सी.सी. बांधकामे-१२, विट बांधकामे-३९ व इतर कच्ची बांधकामे-१४८३) विहितरितीने सिडकोने निष्कासित केली आहेत. तसेच सिडकोमार्फत वेळोवेळी नोडनिहाय आढावा घेऊन निष्कासन मोहिमा राबवून अतिक्रमणे काढण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बोरगाव-कोदामेंढी (ता.मौदा, जि.नागपूर) रस्त्याच्या कामामध्ये कंत्राटदाराकडून अनियमितता झाल्याबाबत

**(४१) * २४४० श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरगाव-कोदामेंढी (ता.मौदा, जि.नागपूर) मार्गाच्या रुंदीकरण व सिमेंटच्या काँक्रिटीकरणाच्या कामामध्ये कंत्राटदाराकडून रस्त्याचा भरणा करताना मुरुमऐवजी वीज केंद्रातील फ्लाय ॲशचा वापर करण्यात येत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बोरगाव-कोदामेंढी (ता.मौदा, जि.नागपूर) या २५ कि.मी. रस्त्याच्या रुंदीकरणासाठी व सिमेंट काँक्रिटीकरणासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कंत्राटदाराला रुपये ४०० कोटीचे कंत्राट देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्यांकडून या मार्गाच्या होत असलेल्या कामाची पाहणी देखील करण्यात येत असून कंत्राटदाराकडून मुरुम ऐवजी फ्लाय ॲशचा वापर करुन निकृष्ट दर्जाचे

काम होत असतानाही कंत्राटदाराशी आर्थिक संगनमत करुन कंत्राटदारांवर कोणतीही कारवाई अधिकाऱ्यांकडून करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, बोरगाव-कोदामेंढी रस्त्याच्या रुंदीकरण व काँक्रिटीकरणाच्या कामाची गुणवत्ता चाचणी दक्षता व गुण नियंत्रण विभागामार्फत करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे दिनांक ३० एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, बोरगाव ते कोंदा मेंढी या रस्त्याचे कामाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निकृष्ट दर्जाचे काम केल्याप्रकरणी सदर निविदा प्रक्रिया रद्द करुन कंत्राटदारास अदा करण्यात आलेली रक्कम वसूल करुन त्याच्यावर गुन्हा दाखल करण्याबाबत तसेच यामध्ये दोषी असलेल्या विभागाच्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) सदर रस्ता काळया मातीच्या क्षेत्रातून जात असल्याने काळया मातीची स्थिरता (Sub base stability) वाढविण्यासाठी Soil stabilization ची पध्दत वापरण्यात येत आहे. सदर Soil stabilization करीता मंजूर Mix design प्रमाणे Fly ash चा वापर करण्यात येत आहे.
(२) हे खरे नाही.

सदर कामाच्या करारनाम्याची रक्कम रुपये ११४.०४ कोटी इतकी आहे.
(३) सदर काम करारनाम्याच्या तरतुदीप्रमाणे कार्यान्वयीत करण्यात येत आहे.
(४) होय, निवेदन प्राप्त आहे.
(५) सदर निवेदनाच्या अनुषंगाने संबंधित मुख्य अभियंता यांचेकडून अहवाल मागविण्यात आला आहे. अहवाल प्राप्त झाल्यावर अहवालातील निष्कर्षानुसार कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई येथील सिडकोची कोटयवधी रूपयांची घरे विक्रीविना पडून असल्याबाबत

**(४२) * ३१७० श्री.श्रीकांत भारतीय, श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) "माझे पसंतीचे सिडकोचे घर" या शीर्षकाखाली सिडकोने लॉटरी काढलेल्या २६ हजार घरांच्या किंमती या खाजगी विकासकांच्या घरांच्या बुकिंग किंमतीपेक्षा ३० ते ३५ टक्के जादा दराने असल्याची बाब माहे मे, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नवी मुंबई येथे सिडकोमार्फत दुर्बल घटक आणि आर्थिक दुर्बल घटक गटाकरीता तळोजा, खारघर, बामणडोंगरी, खारकोपर, कळंबोळी, पनवेल आणि वाशी येथे २६ हजार घरांच्या जाहीर केलेल्या घरांच्या किंमती २६ लाखांपेक्षा अधिक असून सर्वसामान्य नागरिकांच्या उत्पन्नाच्यादृष्टीने घरांच्या किंमती

कमी करण्याची मागणी सर्वसामान्यांकडून केली जात असून त्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(३) असल्यास, सिडकोने आतापर्यंत ऐरोली ते पनवेल येथे बांधलेल्या घरांच्या उभारणी दरम्यान संबंधित बांधकाम ठेकेदारावर नियंत्रण न ठेवल्याने तसेच केलेल्या दुर्लक्षामुळे सदरची बहुसंख्य घरे ही निकृष्ट दर्जाची बांधण्यात आली असून, सध्या अनेक इमारतींचे स्लॅब कोसळून ते खाली पडण्याच्या घटनांचे प्रमाण वाढत आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, सिडकोने ज्या ठेकेदारास हे काम दिले त्यांनी कामाची गुणवत्ता न राखल्याने २५ ते ३० वर्षामध्येच असंख्य इमारतींचा नव्याने पुनर्विकास करण्याची वेळ उद्भवली असल्याने या ठेकेदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, खाजगी विकासकांच्या तुलनेत सिडकोची नवी मुंबईतील घरे / सदनिका या महाग असल्याने सिडकोची विविध योजनेतील आणि विभागातील सुमारे ७ हजार घरे ही विक्रीविना पडून असून सिडकोची हजारो कोटी रूपयांची गुंतवणूक ही अडकून पडल्याची बाब माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदरहू घरांपैकी काही घरे ही विविध योजनांच्या माध्यमातून शासकीय कर्मचारी, कोविड योध्दे, पोलीस कर्मचारी, वैद्यकीय क्षेत्रातील कर्मचारी यांना विकण्याचा सिडको प्रशासनाचा प्रयत्न गेल्या काही कालावधीत यशस्वी होवू शकला नसून नवी मुंबई परिसरात गृहप्रकल्पाच्या नवीन योजना जाहीर केल्यामुळे विक्री विना शिल्लक असलेल्या घरांच्या संख्येत सातत्याने वाढ होत असून सिडको प्रशासनाचे कोटयवधी रूपयांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, सदरहू ठिकाणी जुन्या गृहनिर्माण प्रकल्पातील सदनिकांची विक्री होत नसताना या ठिकाणी नवनवीन गृहनिर्माण प्रकल्प सुरू करण्याची कारणे काय आहेत तसेच सिडको प्रशासनाच्या कोटयवधी रूपयांच्या नुकसानीस जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) सिडकोने बांधलेल्या सदनिकांच्या किंमती ह्या सिडको महामंडळाचे किंमत निश्चितीचे धोरण व बाजारभाव विचारात घेऊन निश्चित करण्यात आलेल्या आहेत. सद्य:स्थितीत घरांच्या किंमती कमी करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

(३) व (४) सिडकोमार्फत बांधकाम केलेल्या इमारती या ३० ते ३५ वर्षापूर्वी बांधकाम पूर्ण झालेल्या असून सदर इमारतीसाठीचा दोषदायित्व कालावधी पूर्ण झालेला आहे. सिडकोने वसविलेल्या वसाहतीमधील सदनिका धारक / गृहनिर्माण संस्था / असोशिएशन यांचेकडून इमारतीचे नियमीत देखभाल व दुरूस्तीचा अभाव हे इमारत धोकादायक होण्याची कारणे आहेत. इमारतींचे संरचनात्मक परिक्षण व इमारतीच्या देखभाल व दुरूस्ती या बाबी सोसायटी / मालक / असोसिएशन यांच्याशी निगडीत आहेत.

सदर गृहनिर्माण प्रकल्पाचा दुरुस्ती व देखभाल कालावधी सन २००७ पर्यंत होता.तसेच प्रकल्पातील बांधकामाच्या गळती दुरुस्तीचा कालावधी सन २०१४ पर्यंत होता.सदनिकाधारकांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सिडकोमार्फत वेळोवेळी कंत्राटदारामार्फत आवश्यक दुरुस्त्या व उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

(५) व (६) सिडको महामंडळाने प्रधानमंत्री आवास योजना २०१७-१८ अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी ८,१८३ घरे व सर्वसाधारण गटासाठी १४,९७४ घरे अशी एकूण २३,१५७ घरे बांधली आहेत. त्यापैकी सुमारे १८,००० घरे विक्री करण्यात आली असून सुमारे ५,००० घरे विक्रीविना रिक्त आहेत. सदर घरे विक्री करण्यासाठी सिडकोमार्फत गृहनिर्माण योजना जाहीर करण्यात येत आहेत.

तसेच सिडको महामंडळामार्फत पोलिसांकरीता २०२० मध्ये आणि कोविड योद्धे व गणवेशधाऱ्यांसाठी २०२१ मध्ये विशेष गृहनिर्माण योजना राबविण्यात आल्या आहेत. सदर गृहनिर्माण योजनेमधील घराची पूर्ण रक्कम भरलेल्या विजेते अर्जदारांसोबत करारनामा करुन घरांचा ताबा देण्यात आला आहे.

(७) 'सर्वांसाठी घरे'योजनेंतर्गत पंतप्रधान आवास योजनेमध्ये सिडकोमार्फत विविध ठिकाणी सुमारे ६७,००० घरे बांधण्यात येत असून त्यानुसार गृहनिर्माण योजना राबवून कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## पुणे महानगरपालिकेचा कोट्यवधी रुपयांचा मिळकत कर दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाकडून वसूल करण्याबाबत

**(४३) * २७८९ श्रीमती चित्रा वाघ, श्री.संजय केणेकर, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाने पुणे महानगरपालिकेचा रुपये २७ कोटी एवढ्या रक्कमेचा मिळकत कर सन २०१९ पासून थकीत ठेवला असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनानाथ मंगेशकर रुग्णालयाने रुपये १० लाख एवढया रकमेची अनामत रक्कम भरली नाही म्हणून एका गर्भवती महिलेवरील उपचार नाकारण्यात आला असून पुणे महानगरपालिकेने कोट्यवधी रुपयांचा कर थकविणाऱ्या रुग्णालयाविरोधात कोणतीही कायदेशीर कारवाई केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सर्वसामान्य करदात्यांकडून मिळकत कर वसूल करण्यासाठी पुणे महानगरपालिका मोहिमा राबवते, परंतु दीनानाथ मंगेशकर रुग्णालयावरील रुपये २७ कोटींचा मिळकत कर वसूल न करणाऱ्या महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशतः खरे आहे.

(२) सदर मिळकत धारकास वेळोवेळी नोटीस व जप्तीचे वॉरंट बजावण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ कराधान नियम ४१ नुसार थकीत रक्कमेवर २ % शास्तीची कारवाई करण्यात येत आहे.

(३) सदर मिळकतीच्या थकबाकीबाबत मिळकतीवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कराधान नियम ४२ चे तरतुदीनुसार सदर मिळकत धारकास महानगरपालिकेकडून वेळोवेळी नोटीस व जप्तीचे वॉरंट

बजावण्यात आले आहेत. सदर मिळकत ही रुग्णालय असल्याने रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून मिळकत सीलिंग करणे अडचणीचे आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक महानगरपालिकेने सदोष निविदा प्रक्रिया राबविल्याबाबत

**(४४) * ३४९६ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती चित्रा वाघ, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक महानगरपालिकेने सांडपाणी प्रक्रियेची रुपये १३०० कोटींची निविदा केंद्र शासनाच्या प्रदूषण नियंत्रण मंडळ तसेच शासनाच्या जीवन प्राधिकरण विभागाच्या परवानगी न घेता प्रसिध्द केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदोष निविदांबाबत तक्रार प्राप्त झाल्यानंतर निविदा प्रक्रियेची तपासणी करुन अहवाल सादर करण्याचे आदेश आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांना दिनांक ९ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, अहवालात काय निष्पन्न झाले आहे तसेच सांडपाणी प्रक्रियेबाबतची सदोष निविदा प्रक्रिया राबविणाऱ्या संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
नाशिक- त्र्यंबकेश्वर कुंभमेळा २०२७ च्या अनुषंगाने दिनांक १७/०१/२०२५, दिनांक २६/०२/२०२५ व २३/०३/२०२५ रोजी आयोजित बैठकांमध्ये मा.मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांनी देण्यात आलेल्या निर्देशानुसार नाशिक महानगरपालिकेने PPP-HAM Model वर प्रकल्प राबविण्याबाबतची निविदा विषयक कार्यवाही केलेली आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी दिनांक ०९/०४/२०२५ रोजीच्या पत्रान्वये मागविण्यात आलेला अहवाल अदयापही अप्राप्त आहे. तथापी नगरविकास विभाग, शासन निर्णय दिनांक ०९/०६/२०२५ च्या निर्णयानुसार सिंहस्थ कुंभमेळयाच्या दृष्टीने नियोजन करण्यासाठी नाशिक महानगरपालिकेच्या मलनि:सारण प्रकल्पास सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावर राबविण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पनवेल महानगरपालिका हद्दीमध्ये नागरी आरोग्य केंद्रांची संख्या वाढविण्याबाबत

**(४५) * २२८४ श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल महानगरपालिका हद्दीतील कामोठे, कळंबोली, पनवेल, नवीन पनवेल आणि खारघर येथे असलेली नागरी आरोग्य केंद्रे ही रुग्णांच्या संख्येच्या तुलनेत अत्यल्प प्रमाणात असून, रुग्णांची होणारी

गैरसोय टाळण्याच्या दृष्टीने लोकसंख्येनुसार नागरी आरोग्य केंद्र उभारण्याची मागणी तेथील स्थानिक नागरिकांकडून करण्यात आल्याची बाब माहे मे, २०२५ च्या दुसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खारघर तसेच अन्य आरोग्य केंद्रात सफाई कर्मचारी वर्ग उपलब्ध नसून डॉक्टर व अन्य संवर्गातील कर्मचाऱ्यांची पदे अपुरी असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पनवेल महानगरपालिका हद्दीत अद्ययावत सोयीसुविधायुक्त नागरी आरोग्य केंद्रांची संख्या वाढविण्याबाबत तसेच दुरवस्था झालेल्या आरोग्य केंद्रांची सुधारणा करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) खरे नाही.
(२) खरे नाही.

नागरी आरोग्य केंद्रांच्या मंजूर प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यामध्ये सफाई कर्मचारी हे पद मंजूर नाही. तथापि, सर्व आरोग्य केंद्रांची नियमित साफसफाई महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागामार्फत करण्यात येते.

सदर आरोग्य केंद्रामध्ये १ पूर्णवेळ वैद्यकीय अधिकारी,१ अर्धवेळ वैद्यकीय अधिकारी,१ अधिपरीचारिता, १ प्रयोगशाळा तंत्रज्ञ,१ औषध निर्माता, ५ आरोग्यसेविका, १ अटेंडट १ १ डेटा एन्ट्री ऑपरेटर (बाह्यस्त्रोत) ही पदे मंजूर आहेत.सदर मंजूर पदानुसार आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

(३) पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये मंजूर १५ आयुष्मान आरोग्य मंदिर(AAM),९ नागरी आयुष्मान आरोग्य मंदिर (UAAM) व २ हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना कार्यन्वित करून १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण करण्यात आलेले आहे.

तसेच, महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वाढती लोकसंख्या विचारात घेऊन अतिरिक्त ५ नागरी आयुष्मान आरोग्य मंदिर (UAAM) मागणी सार्वजनिक आरोग्य विभागाकडे करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कामोठे (नवी मुंबई) येथील रहिवाशांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यासाठीच्या निविदेमध्ये गैरप्रकार झाल्याबाबत

**(४६) * २५२१ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कामोठे (नवी मुंबई) येथील रहिवाशांना टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी सिडकोमार्फत निर्गमित करण्यात आलेली निविदा ही सिडकोच्या कार्यकारी अभियंता व अधीक्षक अभियंता यांच्या संगनमताने जवळच्या ठेकेदारास मिळवून देण्यासाठी, निविदेतील तांत्रिक अटी व तपशील जाणीवपुर्वक ठेकेदाराच्या फायदा होण्याच्या दृष्टीने समाविष्ट करण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निविदेबाबत स्थानिक पातळीवर लोकप्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्ते यांनी तक्रारी करूनही संबंधित अधिकाऱ्यांचे ठेकेदाराशी आर्थिक संगनमत असल्याने कारवाई करण्यास जाणीवपुर्वक दुर्लक्ष करण्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू निविदा तात्काळ रद्द करुन दोषी असलेल्या कार्यकारी अभियंता व अधीक्षक अभियंता यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही.

कामोठे नोडमध्ये होणारा पाणीपुरवठा हा नवी मुंबई महानगरपालिकेच्या मोरबे धरण व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्या पाताळगंगा या स्त्रोतातून करण्यात येतो. ज्यावेळी उक्त प्राधिकरणांकडून जलवाहिनी, पंप हाऊस, विद्युत कामाच्या दुरुस्तीसाठी पाणीपुरवठा खंडीत केला जातो त्यावेळी जलकुंभापासून लांब अंतरावर असलेल्या ग्राहकांना कमी दाबाने व कमी प्रमाणात पाणीपुरवठा होतो. अशा वेळी पाण्याची तुट भरुन काढण्यासाठी सिडकोकडून पर्यायी व्यवस्था म्हणून टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जातो.

कामोठे येथील रहिवाशांना टँकरद्वारे २४ महिने कालावधीसाठी पाणीपुरवठा करणे या कामासाठी दिनांक २०/०८/२०२४ रोजी ई-निविदा मागविण्यात आली होती. सदर निविदेमध्ये एकूण ४ निविदा धारकांनी भाग घेतला होता.सदर निविदेतील अटी व शर्तींनुसार तांत्रिक छाननीअंती एकही निविदा धारक पात्र ठरला नाही. त्यामुळे निविदा समितीच्या दिनांक ४/१२/२०२४ रोजीच्या बैठकीमध्ये सदर निविदा रद्द करुन दुसऱ्यांदा निविदा मागविण्याचे ठरविण्यात आले.

दुसऱ्या निविदेमध्ये जास्तीत जास्त बोली धारकांनी भाग घ्यावा यासाठी निविदेतील आर्थिक निकष शिथिल करुन दिनांक २७/०२/२०२५ रोजी ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली. त्यामध्ये एकूण ४ निविदा धारकांनी भाग घेतला असून त्यापैकी ३ निविदा धारक निविदेतील अटी व शर्तींनुसार आर्थिक निविदा उघडण्यास पात्र ठरले. त्यानुसार आर्थिक निविदा दिनांक १८/०६/२०२५ रोजी उघडण्यात आली असून मे.बी.एम.पाटील हे सर्वात कमी निविदा धारक (एल-१) ठरले असून सदर कामाचे कार्यादेश देण्याची प्रक्रिया सिडको स्तरावर सुरु आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.